ISSN (Print) : Applied...

पुणे.
जीवन शिक्षण
वर्ष : ६८, अंक : ६
सप्टेंबर, २०२३ (मासिक)
किंमत – रु. ३०/–
पृष्ठे ४४

# जीवन शिक्षण

Pune
Jeevan Shikshan
Vol. : 68, Issue : 6
September, 2023 (Monthly)
Price - ₹ 30/-
Pages 44

## माझ्या आठवणीतील गुरू



५ सप्टेंबर

शिक्षकदिन



साक्षर आम्हांस बनवले,
बरोबर–चूक ओळखायला शिकवले,
प्रगतीच्या पायऱ्या चढायला शिकवले,
असे महान गुरू आम्हांस लाभले.

ज्ञानसेवा तु साफल्यम्

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.



शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-२०२३/प्रक्र.४६/एसडी-४ दिनांक २४/०५/२०२३ आणि शासन पत्र क्रमांक: संकीर्ण-२०२३/प्रक्र.४६/एसडी-४ दिनांक २१/०७/२०२३ नुसार नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची राज्यात गुणवत्तापूर्ण व प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्यस्तरीय सुकाणू समिती स्थापन करण्यात आली. सदर समितीची पहिली बैठक दि. ३१ जुलै, २०२३ रोजी दुपारी ०४:३० वाजता, परिषद सभागृह, समिती कक्ष-५, सातवा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई येथे पार पडली. यावेळी शालेय शिक्षण मंत्री, मा. दीपक केसरकर यांनी उपस्थित सर्व शिक्षण संचालक व सुकाणू समिती यांच्याशी संवाद साधला.






राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत राज्याचा शैक्षणिक आराखडा तयार करण्यासाठी सुकाणू समिती गठित करण्यात आली. त्याचा एक भाग म्हणून पायाभूत स्तरावरील (अंगणवाडी/बालवाडीची तीन वर्षे आणि इयत्ता पहिली व दुसरी) आराखडा तयार करण्यासाठी तज्ज्ञांची उपसमिती तयार करण्यात आली. या उपसमितीस शालेय शिक्षण मंत्री, मा. श्री. दीपक केसरकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सुकाणू समितीच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. नियोजनाप्रमाणे ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत आराखडा अंतिम होण्यासाठी तज्ज्ञ समिती सदस्यांनी सक्रिय योगदान द्यावे, असे आवाहन मा. मंत्री, श्री. दीपक केसरकर यांनी केले. यावेळी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे नवनियुक्त संचालक, मा. श्री. अमोल येडगे (भा.प्र.से.) यांचे स्वागत मा. मंत्री महोदयांच्या हस्ते करण्यात आले.

सुकाणू समितीच्या या बैठकीस शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव, मा. श्री. रणजितसिंह देओल, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेचे प्रकल्प संचालक, मा. श्री. प्रदीपकुमार डांगे, शिक्षण (आयुक्त), मा. श्री. सूरज मांढरे (दूरदृश्यप्रणालीद्वारे), सहसचिव मा. श्री. इम्तियाज काझी, शिक्षण संचालक (माध्यमिक), मा. श्री. संपत सूर्यवंशी, शिक्षण संचालक (प्राथमिक) मा. श्री. शरद गोसावी (दूरदृश्यप्रणालीद्वारे), बालभारतीचे संचालक, मा. श्री. कृष्णकुमार पाटील, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक, मा. श्री. अमोल येडगे, सहसंचालक, मा. श्री. रमाकांत काठमोरे, उपसंचालक, मा. डॉ. नेहा बेलसरे, मा. डॉ. कमलादेवी आवटे यांच्यासह सुकाणू समिती सदस्य उपस्थित होते.

# जीवन शिक्षण

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

❖ मूल्य : रु. ३०/-
❖ वार्षिक वर्गणी रु. ३००/-
❖ प्रती : ५७,०००

**वर्ष ६८** | **सप्टेंबर, २०२३** | **अंक ६ वा**



❖ **प्रवर्तक : शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन**

❖ **प्रकाशन सल्लागार समिती :**

**अमोल येडगे** (भा.प्र.से.), संचालक — **अध्यक्ष**

**रमाकांत काठमोरे,** सहसंचालक — **कार्यकारी संपादक**

**डॉ. नेहा बेलसरे,** प्राचार्य, आय.टी. व प्रसारमाध्यम आणि सामाजिक शास्त्र व कला-क्रीडा — **सहसंपादक**

**डॉ. कमलादेवी आवटे,** प्राचार्य, भाषा आणि समन्वय — **सदस्य**

**डॉ. शोभा खंदारे,** प्राचार्य, जि. शि. व प्र. सं., पुणे. — **सदस्य**

**ज्योती उपाशी,** सहा. संचालक, लेखा — **सदस्य**

**रत्नप्रभा भालेराव,** वरिष्ठ अधिव्याख्याता — **सदस्य**

**सचिन चव्हाण,** वरिष्ठ अधिव्याख्याता — **सदस्य**

❖ **निर्मिती सहायक :**
**डॉ. बालमणी नंदाला,**
अधिव्याख्याता (प्रसारमाध्यम आणि उर्दू विभाग)

❖ **संपादन मंडळ :**
माधव राजगुरू, नंदा कुलकर्णी,
श्रीकांत चौगुले, सलिल वाघमारे.

❖ **संपादक :**
**अरुण सांगोलकर,** वरिष्ठ अधिव्याख्याता तथा विभाग प्रमुख (प्रसारमाध्यम, इंग्रजी आणि उर्दू) — **सदस्य सचिव**


## अंतरंग


| | | |
|---|---|---|
| संपादकीय | – | ४ |
| गुण गाईन आवडी | डॉ. वसंत काळपांडे | ५ |
| शिक्षकत्वाचे एव्हरेस्ट – बॅ. पी. जी. पाटील | शिवाजी तांबे | ११ |
| बाल मुखावरील हास्य... हाच खरा शिक्षक पुरस्कार! | डॉ. गोविंद नांदेडे | १५ |
| तस्मै श्री गुरवे नमः | डॉ. न. म. जोशी | १७ |
| चैतन्याचे झरे | शशिकांत शिंदे | २३ |
| शिक्षक हेच दुसरे पालक | अरुण सांगोलकर | २८ |
| टाकीचे घाव | डॉ. संजय मालपाणी | २९ |
| अशी झाली माझी जडणघडण | संदीप वाकचौरे | ३१ |
| असे शिक्षक होणे नाही! | नंदा कुलकर्णी | ३६ |
| मारक्या गुरुजींनी तोल सावरायला शिकवले | उत्तम कांबळे | ३९ |
| इतिहासाच्या पानांवरून | श्रीकांत चौगुले | ४२ |



'जीवन शिक्षण' हे मासिक मालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र यांचेकरिता, मुद्रक व प्रकाशक अरुण सांगोलकर यांनी रुना ग्राफिक्स, स. नं. ६४, त्रिमुर्ती हॉस्पिटलमागे, वडगांव (बु.), सिंहगड रोड, पुणे ४११ ०४१ येथे छापून राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, ७०८, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक : अरुण सांगोलकर.

'Jeevan Shikshan' monthly publication is owned by Rajya Shaikshanik Sanshodhan Va Prashikshan Parishad, Maharashtra, Printed and Published by Arun Sangolkar, Printed at Runa Graphics, S. No. 64, Behind Trimurti Hospital, Vadgaon (Bk.), Sinhagad Road, Pune - 411 041 and Published at Rajya Shaikshanik Sanshodhan Va Prashikshan Parishad, Maharashtra, 708, Sadashiv Peth, Pune 411 030. Editor : Arun Sangolkar.

**दूरध्वनी :** ०२०-२४४८८३८२ **ई-मेल :** jeevanshikshan@maa.ac.in **वेब लिंक :** https://scertmaha.ac.in/jeevanshikshan/



*या अंकातील लेखांमधून व्यक्त झालेल्या विचारांशी किंवा मतांशी जीवन शिक्षण संपादकीय मंडळ सहमत असेलच असे नाही.*

# संपादकीय ....

मित्रहो,

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे या संस्थेच्या वतीने नवनवीन विषयांवर ‘जीवन शिक्षण’ मासिक दरमहा प्रकाशित केले जाते. माहे जून ते ऑगस्ट २०२३ मधील सर्व अंक राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०, निपुण भारत अभियान, तसेच मानवी जीवनातील वाचनाचे महत्त्व लक्षात घेऊन प्रकाशित करण्यात आले.

सप्टेंबर महिन्याचाही अंक एक आगळीवेगळी संकल्पना घेऊन आपल्यापुढे येत आहे. सप्टेंबर महिना म्हटले की, आपणास आठवतो तो ’शिक्षक दिन’. दरवर्षी हा दिवस आपण डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जन्मदिवसाच्या निमित्ताने ५ सप्टेंबर या दिवशी साजरा करत असतो. या निमित्ताने आपल्या आयुष्यात लाभलेल्या गुरुजनांविषयी असणारी निष्ठा व सन्मान प्रकट करण्यासाठी ‘माझ्या आठवणीतील गुरू’ हा विशेषांक आपल्या हाती देताना मला मनस्वी आनंद होत आहे.

कोठारी आयोगाने प्रतिपादित केलेल्या 'The destiny of india is being shaped in it's classrooms' या वाक्यावरून, शिक्षकांच्या हातात देशाचे भविष्य असते हे अधोरेखित होते, कारण भविष्यातील संशोधक, इंजिनिअर, डॉक्टर, साहित्यिक, लेखक, शिक्षक, शास्त्रज्ञ इत्यादी अनेक क्षेत्रांमध्ये प्रगती करू शकणारी व देशाचे नाव उंचावणारी नवीन पिढी घडवण्याचे सामर्थ्य शिक्षकांमध्ये असते.

सदर अंकामध्ये प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ, साहित्यिक, लेखक, पत्रकार, सेवानिवृत्त शिक्षण संचालक, उद्योजक, शिक्षक इत्यादी मान्यवर मंडळींनी आपल्या लेखणीतून गुरुजनांविषयीचा आदर व कृतज्ञता व्यक्त केलेली आहे. सदर अंकातील लेखांमध्ये गुरूंविषयीच्या आठवणी व तत्कालीन परिस्थितीत आलेले अनुभव यांचे कृतज्ञतापूर्वक वर्णन करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

मा. डॉ. वसंत काळपांडे यांनी ‘गुण गाईन आवडी’ या लेखात त्यांना त्यांच्या शालेय जीवनात लाभलेल्या शिक्षकांच्या गुणवैशिष्ट्यांचा ऊहापोह केलेला आहे. मा. शिवाजी तांबे यांच्या ‘शिक्षकत्वाचे एव्हरेस्ट’ या लेखातून त्यांच्या आयुष्याला कलाटणी देणाऱ्या बॅ. पी. जी. पाटील यांच्या सहवासाचा, विचारांचा त्यांच्या जीवनावर कसा प्रभाव पडला याबाबतचे अनुभव व्यक्त केले आहेत. तसेच मा. डॉ. गोविंद नांदेडे यांनी ‘बालमुखावरील हास्य हाच खरा शिक्षकांच्या जीवनातील पुरस्कार असतो’ याबाबतचे विस्तृत विवेचन केले आहे.

मा. डॉ. न. म. जोशी यांच्या ‘तस्मै श्री गुरवे नमः’ या लेखातून त्यांनी आपल्या जीवनाच्या जडणघडणीमध्ये शिक्षकांची भूमिका कशी महत्त्वाची असते याचे वर्णन केले आहे. मा. शशिकांत शिंदे यांनी ‘चैतन्याचे झरे’ या लेखात त्यांच्या आयुष्यात प्रत्येक स्तरावर लाभलेल्या गुरुजनांनी केलेले संस्कार व त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर पडलेला प्रभाव यांची सुंदर मांडणी केलेली आहे तसेच मा. अरुण सांगोलकर यांच्या ‘शिक्षक हे दुसरे पालक’ या लेखात शिक्षक पालकाची भूमिका कशी बजावतात याचे विवेचन केले आहे, तर डॉ. संजय मालपाणी यांनी ‘टाकीचे घाव’ या आपल्या लेखातून वाचन, श्रवण व मूल्यसंस्कार यासोबतच, उद्योजकता आणि शिक्षण या क्षेत्रांमध्ये भरीव योगदान देताना आपल्या जीवनात संस्कार रुजविणाऱ्या शिक्षकांची भूमिका स्पष्ट केली आहे.

मा. संदीप वाकचौरे यांच्या ‘अशी झाली माझी जडणघडण’ या लेखात विशेष स्मरणात राहिलेल्या शिक्षकांची वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी व त्या विषयीची कृतज्ञता त्यांनी व्यक्त केली आहे, मा. नंदा कुलकर्णी यांच्या ‘असे शिक्षक होणे नाही’ या लेखाद्वारे शिक्षक प्रशिक्षणाच्या काळात भेटलेल्या आणि त्यांच्या गुणवैशिष्ट्यांमुळे लक्षात राहिलेल्या अनुभवांचे कथन केले आहे. मा. उत्तम कांबळे यांच्या ‘गुरुजींनी तोल सावरायला शिकवले’ या लेखातून त्यांनी आपल्या शालेय वयातील विविध आठवणी जागवण्याचा प्रयत्न केलेला आहे.

वरील सर्वच लेखांतून उत्तम संस्कार घडवणारे गुरू लाभल्याने, आयुष्याला योग्य दिशा मिळाल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केलेली दिसून येते. आपणही शिक्षक दिनाच्या निमित्ताने आपल्या आयुष्यात भेटलेल्या गुरूंचे स्मरण करून त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करू या.

आपणा सर्वांना शिक्षक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

**संपादक**
जीवन शिक्षण
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,
महाराष्ट्र, पुणे.

# गुण गाईन आवडी

**डॉ. वसंत काळपांडे**
सेवानिवृत्त शिक्षण संचालक
आणि शिक्षणतज्ज्ञ
भ्रमणध्वनी : ९८२३०५१८०९

*शिक्षणक्षेत्रात भरीव कामगिरी करणारे डॉ. वसंत काळपांडे यांनी ते ज्या शाळांत शिकले, तेथील शिक्षकांच्या वैशिष्ट्यपूर्ण बाबींचा उल्लेख करून त्यांच्याविषयीची कृतज्ञता व्यक्त केली आहे. वाचन आणि लेखन यांच्या आवडीसाठी शिक्षकांचे प्रेरक प्रयत्न, राम दारव्हेकरांचे सावरकर प्रेम आणि शिकवण, तसेच माणिकचंद कानेड सरांची व्यावसायिक नीतिमत्ता याबाबींचा विशेष उल्लेख केला आहे. अत्यंत महत्त्वपूर्ण प्रेरक लेख.*

शाळा-महाविद्यालयांमध्ये ज्यांनी आपल्याला शिकवले आहे, असे अनेक शिक्षक असतात. त्यांच्यापैकी काही जण उत्कृष्ट शिकवणारे असतात, पण 'जेथे जातो तेथे तू माझा सांगाती' या उक्तीप्रमाणे, जे प्रत्यक्ष आपल्या सोबत नसले, तरी सोबत असल्याप्रमाणेच कायम वाट दाखवत असतात; असे आयुष्याला कलाटणी देणारे, त्याची दिशाच बदलवून टाकणारे, ज्यांना गुरू म्हणता येईल, असे शिक्षक दुर्मीळ असतात. सुदैवाने मला असे अनेक गुरू लाभले. विद्यार्थ्यांना समजून घेणारे, त्यांना कान आणि वेळ दोन्ही देणारे, परंतु प्रयत्न मात्र विद्यार्थ्यांचेच असतील अशा वृत्तीने काम करणाऱ्या माझ्या शालेय जीवनातील काही गुरूंबद्दलच्या काही निवडक आठवणी या लेखात देत आहे.

## परीक्षेची भीती घालवणारी शाळा :

१९५६ मध्ये मी पहिलीत गेलो. चौथीपर्यंत मी बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव नगरपरिषदेच्या सहा नंबरच्या शाळेत शिकलो. या शाळेत गोष्टी सांगणे, गाणी गाणे, खेळ खेळणे, कोडी सोडवणे, चित्रे काढणे, मातीच्या आणि ज्वारीच्या धांड्यांच्या प्रतिकृती तयार करणे, अवांतर वाचन करणे, पाढे आणि कविता यांचे पाठांतर करणे, यांवर भर असायचा. चौथीला शिकवणाऱ्या भारंबे सरांचा सुलेखनावर भर असायचा. आठवडी, तिमाही, सहामाही, वार्षिक अशा परीक्षा असायच्या. तिसरीला भालेराव बाई तर रोजच छोट्या छोट्या चाचण्या घ्यायच्या. एका विद्यार्थ्याने लिहिलेली उत्तरे दुसऱ्या विद्यार्थ्याला तपासण्यासाठी द्यायच्या. गैरहजर विद्यार्थ्यांच्या परीक्षा, ते शाळेत येतील तेव्हा घेतल्या जायच्या. घड्याळ पाहून वेळ सांगणे, दिशा सांगणे, नकाशा वाचन हे प्रत्यक्ष अनुभवातूनच तपासले जायचे. भाषा आणि गणित यांची तोंडी परीक्षासुद्धा असायची. विद्यार्थी शाळेत जे काही करायचे त्या सर्व गोष्टींना गुण असायचे. विद्यार्थ्यांचा पोशाख, स्वच्छता, त्यांची शाळेतील वागणूक या गोष्टीसुद्धा पाहिल्या जायच्या. परीक्षा आणि अध्ययन-अध्यापन यांच्यातील फरक लक्षातच यायचा नाही. आज ज्याला आपण सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन, ३६० अंश मूल्यमापन म्हणतो, ते यापेक्षा वेगळे काय असते?

## लेखनाची आवड निर्माण करणाऱ्या डांगे बाई :

इयत्ता पाचवी ते आठवीपर्यंत मी अमरावतीच्या सायन्स कोअर या सरकारी शाळेत शिकलो. आठवीत कमलताई देशपांडे वर्गशिक्षिका होत्या, कमलताई डांगे मराठी शिकवायच्या. १९६३ मध्ये शुद्धलेखनाचे नवीन

नियम लागू झाले. त्यांचा सराव व्हावा म्हणून डांगे बाई आम्हांला रोज एक सुविचार किंवा कवितेचे कडवे यांचे श्रुतलेखन द्यायच्या. त्याच्या अर्थाबद्दल, उतारा ज्यातून घेतला तो मूळ लेख, कविता किंवा पुस्तक यांच्याबद्दल चर्चा घडवून आणायच्या. विद्यार्थ्यांनी स्वतःच्या भाषेत लिहावे याबद्दल त्या आग्रही असायच्या. निबंधात वापरलेल्या नवीन कल्पनांचे कौतुक करायच्या. देशपांडे आणि डांगे बाईंनी शाळेच्या वार्षिकाच्या संपादनाची जबाबदारी माझ्याकडे सोपवली होती. साहित्याची निवड, नियतकालिकाचे मुखपृष्ठ, शीर्षकपृष्ठ, अनुक्रमणिका, मजकुराचे शुद्धलेखन, व्याकरण, अचूकता, सजावट अशा विविध अंगांनी संपादन कसे करायचे, हे आठवीत असतानाच मला शिकायला मिळाले.

२७ मे, १९६४ रोजी पंडित जवाहरलाल नेहरू यांचे निधन झाले. त्यांचे जाणे देशासाठी फार मोठा धक्का होता. त्या वेळी मला एक कविता लिहावीशी वाटली. ही कविता लिहून सुमारे साठ वर्षे झाली. मला ती जशी आठवते तशी पुढे देत आहे :

*कोणी म्हणती नेहरू गेले*
*म्हणती ते दळभद्री सगळे*
*नेहरू म्हणजे काय तयांना*
*कधीच नाही मनी उमगले*

*देहाचे ते स्थान संकुचित*
*सोडुनि गेला आत्मा त्यांचा*
*एकरूप तद्देह नि आत्मा*
*कण नि कणाने भारतभूच्या*

ही कविता कोणाला तरी दाखवावी असे मला सारखे वाटत होते. त्या वेळी शाळेला उन्हाळ्याची सुट्टी होती, तरीही ही कविता मी डांगेबाईंना त्यांच्या घरी जाऊन दाखवली. त्यांना ही कविता खूपच आवडली. माझ्या छोट्या छोट्या गोष्टींचेही त्या कौतुक करायच्या. या कवितेबद्दलही तसेच काही झाले असावे, असे मला वाटले. मी त्याच वर्षी शाळा बदलली होती. (पूर्वीच्या) शाळेच्या स्नेहसंमेलनात डांगेबाईंनी ही कविता वाचून दाखवली होती. त्या वेळी मी त्या शाळेत शिकत नसलो तरी मला खास बोलावून घेतले होते. त्यानंतर मी कधीही कविता लिहिली नसली, तरी आपण लिहू शकतो हा आत्मविश्वास निर्माण झाला.

### कौशल्य शिक्षण देणारी शाळा :

इयत्ता नववी ते अकरावीपर्यंत मी प्रशस्त आणि सुंदर इमारत, सुसज्ज कार्यशाळा, प्रयोगशाळा आणि समृद्ध ग्रंथालय असलेल्या अमरावतीच्या कलानिकेतन या तंत्रशिक्षण देणाऱ्या सरकारी शाळेत शिकलो. लोहारकाम, सुतारकाम, वायरिंग, फिटिंग, टर्निंग, पॅटर्न मेकिंग, मोल्डिंग, वेल्डिंग अशा प्रत्येक ट्रेडसाठी एक स्वतंत्र निदेशक असायचे. वर्कशॉप सुपरिंटेंडन्ट हेडाऊ सर आणि मेकॅनिकल इंजिनिअरिंग शिकवणारे जे. के. पाटील सर यांनी या क्षेत्रात कंटाळा न करता सराव करणे किती महत्त्वाचे असते हे बिंबवले. इंजिनिअरिंग ड्रॉईंग शिकताना सुरुवातीलाच (टी–स्क्वेअर आणि सेट स्क्वेअर्स वापरूनही) एक साधी ‘चांगली’ सरळ रेषा काढण्यासाठी मला किमान सत्तर वेळा प्रयत्न करावे लागल्याचे आठवते. एवढ्या सरावानंतर मी काढलेल्या रेषेच्या मीच प्रेमात पडलो. रसायनशास्त्र आणि भौतिकशास्त्र यांच्या प्रयोगांसाठी उपकरणे सज्ज करणे ही कामे अभ्यासक्रमाचा भाग म्हणून विद्यार्थ्यांनीच करणे अपेक्षित असायचे. रसायनशास्त्राच्या प्रयोगशाळेत वायुवाहक नळ्या कापणे, वाकवणे, बुचांना छिद्रे पाडणे, त्यात वायुवाहक नळ्या घालणे, बुचे आणि परीक्षा नळ्या प्लास्टर ऑफ पॅरिसने हवाबंद करणे, सांगितलेल्या तीव्रतेची द्रावणे तयार करणे ही कामे मला खूप आवडायची. ग्रंथालयातील पुस्तकांप्रमाणेच प्रयोगशाळेतील चुंबक, ताणकाटा, काचेच्या चिपा,

भिंगे, आरसे आणि इतर अनेक गोष्टी घरी नेण्याची मुभा असायची. प्रयोग केवळ प्रयोगशाळेतच नाही, तर घरीसुद्धा करता येतात, ही दृष्टी त्यामुळे मिळाली. रसायनशास्त्र आणि भौतिकशास्त्र या विषयांच्या प्रात्यक्षिक आणि सैद्धांतिक बाजू घाटोळ सर आणि सरदेशमुख सर यांनी खूपच समर्थपणे हाताळल्या. गणित हा विषय अगदी सुरुवातीपासून मुळातच माझ्या आवडीचा विषय होता. फारसा न आवडणारा विज्ञान हा विषय मला या दोघांमुळे आवडायला लागला. 'कारागिरी' च्या क्षेत्रांत अतिशय महत्त्वाची असलेली अचूकता, वेग, नीटनेटकेपणा आणि सुबकता ही हार्ड स्किल्स आणि वक्तशीरपणा, चिकाटी, कामातील आणि वागण्यातील सहजता आणि टीमवर्क ही सॉफ्ट स्किल्स जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रांत आयुष्यभर तेवढीच महत्त्वाची असतात. या गुणांची मौल्यवान देणगी कलानिकेतनने आम्हांला दिली.

### स्वत:च्या भाषाशैलीचा शोध :

लिहिताना मला आवडणाऱ्या लेखकांच्या लेखनशैलीचे मी बऱ्याचदा अनुकरण करत असे. कलानिकेतनमध्ये राम दारव्हेकर सर आम्हांला मराठी शिकवायचे. सुप्रसिद्ध नाटककार पुरुषोत्तम दारव्हेकर यांचे ते भाऊ. एकदा त्यांनी आम्हांला 'उन्हाळ्याची सुट्टी' या विषयावर विनोदी निबंध लिहायला सांगितला होता. माझा निबंध वाचल्यानंतर ते म्हणाले होते, ''निबंध छान झाला; पण आपण श्रीपाद कृष्ण कोल्हटकर नाही; वसंत काळपांडे आहोत, हे लक्षात ठेवावे.'' दारव्हेकर सरांचा विद्यार्थ्यांनी स्वतःच्या भाषेत, स्वतःच्या शैलीत लिहावे यावर भर असायचा.

मला माझ्या भाषाशैलीचा शोध लागला तो प्रामुख्याने भौतिकशास्त्राच्या सरदेशमुख सरांमुळे. साध्या, थेट, कमीतकमी शब्दांचा वापर असणाऱ्या, ओघवत्या, अनलंकृत आणि आपल्याला जे काही सांगायचे आहे, त्याचे स्पष्ट चित्र डोळ्यांपुढे उभे करणाऱ्या भाषाशैलीवर त्यांचा भर होता. पुस्तकातील मजकूर पाठ करून जसाच्या तसा लिहिण्याऐवजी तो स्वतःच्या भाषेत लिहावा आणि भाषा आणि अचूकता या दृष्टींनी नऊ वेळा तरी तपासावा अशी त्यांची शिकवण होती. एखादा विद्यार्थी पुस्तकातील बोजड वाक्ये जशीच्या तशी वापरू लागला, तर ते म्हणायचे, ध्वनिबोध होतो, पण अर्थबोध होत नाही. सरदेशमुख सर आणि दारव्हेकर सर यांच्यामुळे माझी भाषा घडली. Elements of Electrical and Mechanical Engineering, Statics, Dynamics, Probability, Permutations and combinations, Solid Geometry अशा विषयांसाठी इंग्रजी पुस्तकांचा आधार घ्यावा लागायचा. जे. के. पाटील सर आणि गणिताचे काळवीट सर आणि खिरे सर त्यासाठी इंग्रजी पुस्तके वाचण्यासाठी प्रोत्साहन देत. गणित आणि विज्ञान या विषयांवर इंग्रजीतील इतरही अनेक पुस्तके त्या काळात मी वाचली. माझ्या शाळेत मला द्वैभाषिक अध्ययनपद्धती अनुभवायला मिळाली.

'कलानिकेतन'मध्ये भैयासाहेब निंबेकर आम्हांला शारीरिक शिक्षण शिकवायचे. त्यांच्याकडे शाळेच्या ग्रंथालयाचाही कार्यभार होता. त्यांनी मला कोणतीही पुस्तके घरी न्यायची परवानगी दिली होती. या काळात मी एका लेखकाची पुस्तके वाचायला सुरुवात केली, की त्यांची सर्व पुस्तके वाचून काढत असे. त्यामुळे त्या लेखकाची लेखनशैली चांगली कळायची. मुन्शी प्रेमचंद, रामधारी सिंह 'दिनकर', मैथिलीशरण गुप्त, सूर्यकांत त्रिपाठी 'निराला', सुभद्रा कुमारी चौहान हे हिंदीतील माझे आवडते लेखक आणि कवी होते. रहस्यकथा लेखक बाबुराव अर्नाळकर यांचा माझ्या पिढीची वाचनाची आवड वाढवण्यात मोठा वाटा होता. अर्थात बाबुराव अर्नाळकरांच्या कादंबऱ्या शाळेच्या ग्रंथालयात मिळायच्या नाहीत. त्या दुसरीकडून मिळवाव्या लागायच्या. याच काळात शाळेच्या ग्रंथालयात असलेली

विज्ञान आणि गणितावरची अनेक इंग्रजी आणि मराठी पुस्तके मी वाचून काढली. अनेक शास्त्रज्ञ आणि गणिततज्ज्ञ यांच्या जीवनावरील पुस्तके मी याच काळात वाचली. आकाशनिरीक्षणावरील पुस्तके, वेगवेगळ्या नक्षत्रांवरील भारतीय आणि ग्रीक पुराणकथा वाचल्या. भास्कराचार्यांच्या 'लीलावती' या ग्रंथाचा मराठी अनुवाद आमच्या शाळेच्या ग्रंथालयात होता. त्यातील प्रश्न सोडवताना खूप मजा वाटायची. लीलावती या ग्रंथावरून त्या काळातील सामाजिक आणि सांस्कृतिक परिस्थितीची बऱ्यापैकी कल्पना यायची. मी कोणती पुस्तके वाचावी, यावर शाळेत किंवा घरी कोणतेही बंधन नव्हते. चांगले संस्कार व्हावेत यासाठी दर्जेदार पुस्तकेच वाच, असा आग्रह नव्हता. चांगल्या साहित्याबरोबरच सुमार दर्जाचेही साहित्य मी वाचले. तरीही चांगल्या आणि वाईट साहित्यातील फरक कळण्यात मला कोणतीच अडचण आली नाही. इंग्रजीत वाचलेल्या माहितीच्या आधारे मी लिहिलेले विज्ञानावरचे काही लेख 'अमृत' आणि 'श्रीयुत' या मराठी डायजेस्टमध्ये छापून यायला लागले होते. पुढे महाविद्यालयाच्या वार्षिक अहवालात मी पुंज सिद्धांतावर (Quantum Theory), तसेच मॅक्स प्लँक आणि अर्नेस्ट रुदरफोर्ड या शास्त्रज्ञांच्या जीवनावर मराठीत लेखही लिहिले होते.

### स्वातंत्र्यवीर सावरकरांचे प्रायोपवेशन :

नववी ते अकरावीपर्यंत मराठी शिकवणारे राम दारव्हेकर सर उत्कृष्ट शिक्षक तर होतेच, परंतु ते सावरकरांचे अनुयायीसुद्धा होते. मराठीला पुरवणी वाचनासाठी नववी ते अकरावीपर्यंत अनुक्रमे 'अठराशे सत्तावन्नचा स्वातंत्र्यसेनानी', 'ती धन्य बंदिशाला' आणि 'उमाजी नाईक' ही पुस्तके आम्हांला पुरवणी वाचनासाठी होती.' 'अठराशे सत्तावन्नचा स्वातंत्र्यसेनानी' ही कादंबरी तात्या टोपे यांच्या जीवनावर आधारलेली होती. १८५७ च्या लढ्याला पूर्वी 'शिपायांचे बंड' म्हणत. त्याला 'पहिले स्वातंत्र्यसमर किंवा स्वातंत्र्ययुद्ध' हे नाव स्वातंत्र्यवीर सावरकरांनीच दिले, हे दारव्हेकर सरांमुळेच कळले. सावरकरांच्या पद्धतीप्रमाणे सर सर्व स्वर 'अ' च्या बाराखडीत लिहीत. मीसुद्धा अनेक वर्षे तसेच लिहीत होतो.

स्वातंत्र्यवीर सावरकरांना मी प्रत्यक्षात कधी पाहिले नाही, परंतु त्यांच्या 'स्वतंत्रते भगवती', 'सागरा प्राण तळमळला', 'माझे मृत्युपत्र' अशा कवितांतून भेटणारी भावनोत्कटता आणि प्रखर राष्ट्रभक्ती यांचा संगम असलेले प्रतिभाशाली कवी; तर त्यांच्या लेखांतून 'गाय हा एक उपयुक्त पशु आहे, देव नाही. एखाद्या वेळी थोडी गोहत्या झाली तरी चालेल, परंतु राष्ट्राची बुद्धिहत्या होऊन चालणार नाही,' अशा जळजळीत शब्दांत विचार मांडणारे, पोथीनिष्ठेतून बाहेर पडण्याचे आवाहन करणारे विज्ञाननिष्ठ विचारवंत अशी दोन टोकांची त्यांची रूपे त्यांच्या साहित्यातून अनुभवली होती.

स्वातंत्र्यवीर सावरकर गेले त्या वेळी मी दहावीत होतो. १९६६ मध्ये सावरकरांनी प्रायोपवेशन (आत्मार्पण) करण्याचा निर्णय घेतला. एवढ्या शूरवीर व्यक्तीने अशी आत्महत्या का करावी? आम्ही आपापसांत चर्चा करत होतो. दारव्हेकर सरांनाच आपण विचारू, असा आम्ही विचार केला. सरांना राग येईल काय, असे आम्हांला वाटले, पण आम्ही धाडस करून सरांना विचारलेच. सर रागावले नाहीत. त्यांनी शांतपणे आम्हांला समजावून सांगितले.

'सर्वसामान्य माणसाला आपला जीव खूप प्रिय असतो; परंतु परिस्थिती हाताबाहेर गेली, तिला तोंड द्यायची त्याच्याकडे हिंमत राहिली नाही, तर वैफल्यग्रस्त होऊन तो आत्महत्या करतो. हे चूकच आहे. म्हणूनच अशा रीतीने आपले जीवन संपवणे कायद्याने गुन्हा आहे; परंतु आपले जीवनच समाजासाठी आहे, अशा भावनेने आयुष्यभर कार्य करणाऱ्या व्यक्तींना आपले या

जगातील कार्य संपले, असे ज्या वेळी वाटते अशा वेळी ते आपले जीवन संपवतात. त्याला 'समाधी' म्हणतात. सावरकरांचे प्रायोपवेशन हा समाधीचाच प्रकार आहे.'

सावरकरांचा मृत्यू झाल्यानंतर दारव्हेकर सर तीन–चार दिवस तरी येणार नाहीत, असा आमचा समज होता, पण सर आले. त्यांनी नेहमीप्रमाणे शिकवायला सुरुवात केली. ''सर, तुम्ही नाही गेलात मुंबईला?'' आम्ही विचारले. ''मी? नाही.'' सर म्हणाले. ''का, सर?'' आम्ही विचारले. ''सावरकरांकडून मी हेच तर शिकलो.'' ते म्हणाले. त्यांनी पुन्हा शिकवायला सुरुवात केली. मात्र ते उदास वाटले. संध्याकाळी आम्ही काही जण सरांच्या घरी गेलो. ते खूप मनमोकळेपणाने आमच्याशी बोलले. मनातील ज्या गोष्टी शाळेत बोलता येत नाहीत अशा. आम्हांला आणखी समृद्ध झाल्यासारखे वाटले.

### व्यावसायिक नीतिमत्ता :

१९६४ मध्ये नववीला आम्हांला माणिकचंद नेमासा कानेड यांनी इंग्रजी शिकवले. इतर शिक्षक active voice to passive voice, change into past/present/future tense, substitution tables अशा पद्धतीने शिकवायचे. परीक्षेत गुण मिळवायला हे पुरेसे असायचे. पण ही पद्धत खूप कंटाळवाणी वाटायची. कानेड सरांची शिकवण्याची पद्धत खूपच वेगळी होती. ते कोणताही पाठ शिकवताना वर्गात जिवंतपणा आणायचे. बहुतेकदा मुलांकडून नाट्यीकरण करवून घ्यायचे. ते स्वतः नाट्यशास्त्राचे अभ्यासक होते. ॲबसर्ड थिएटर, जागतिक रंगभूमी (पूर्वरंग) आणि जागतिक रंगभूमी (पश्चिमरंग) ही पुस्तके त्यांनी लिहिली होती. इंग्रजीबरोबर मराठीचा वापर केला तरी कानेड सरांची हरकत नसायची. 'Uncle Podger Hangs a Picture' हा पाठ त्यांनी आम्हांला शिकवला होता. त्याचे नाट्यीकरण करताना खूप गंमत यायची. नववीनंतर दहावीतसुद्धा कानेड सरच इंग्रजी शिकवायला असतील, अशी आमची खात्री होती. पण दुसरेच शिक्षक आले. पुन्हा तीच कंटाळवाणी पद्धत सुरू झाली. कानेड सरांची विदर्भ महाविद्यालयात लेक्चरर म्हणून निवड झाली होती. दोन–एक महिन्यांत ते काही औपचारिक बाबी पूर्ण झाल्यानंतर शाळा सोडून जाणार होते. अधूनमधून ऑफ तासाला ते यायचे. दहावीत 'All About a Dog' हा पाठ होता. हा पाठ कानेड सरांनी शिकवला असता तर किती छान झाले असते, असे आम्हांला वाटले.

एका ऑफ तासाला कानेड सर आले, त्या वेळी आम्ही त्यांना विचारले. ते म्हणाले, ''मलाही हा पाठ शिकवायला आवडलं असतं, पण इंग्रजी शिकवायला तुम्हांला चापोरकर सर असल्यामुळे मी तसं करणं व्यावसायिक नीतिमत्तेला धरून नाही.'' आम्हांला व्यावसायिक नीतिमत्ता म्हणजे काय, हे माहीत नव्हते. 'सर आपल्या पेशाकडे धंदा म्हणून पाहतात?' असा विचार आमच्या मनात आला. पण तो मनातच ठेवला. असेच काही दिवस गेले. कानेड सरांचा शाळा सोडून जाण्याचा दिवस आला. तो शनिवार होता. त्या दिवशी शेवटचा तास घेणारे शिक्षक आले नव्हते, म्हणून योगायोगाने कानेड सर वर्गावर आले होते. यानंतर ते पुन्हा दिसणार नाहीत, म्हणून वर्गातील वातावरण उदास होते.

''तुम्ही पूर्वी मला 'All About a Dog' हा पाठ शिकवण्याबद्दल विचारलं होतं ना?'' त्यांनी आम्हांला विचारले. ''हो, सर. पण ते व्यावसायिक नीतिमत्तेला सोडून होईल, असं त्या वेळी तुम्ही सांगितलं होते व्यावसायिक नीतिमत्ता म्हणजे काय?'' आम्ही विचारले. प्रोफेशनल एथिक्स म्हणजे काय, हे समजावून सांगितले. ते म्हणाले, ''तुमचा व्यवसाय कोणताही असो; त्याच्याशी Professional ethics व्यावसायिक नीतिमत्ता निगडित असतेच. विद्यार्थी म्हणून तुम्हांलासुद्धा काही नैतिक मूल्यं पाळावी लागतात. तुमच्यासाठी ही मूल्यं पाळणं म्हणजेच व्यावसायिक नीतिमत्ता.'' या विषयावर बरीच चर्चा झाली.

''आज तुमची इच्छा असेल, तर मी तुम्हांला 'All About a Dog' हा धडा शिकवेन.'' सर म्हणाले.

''नको, सर. आज आमचा मूड नाही आणि तुम्ही हा धडा शिकवणं आजसुद्धा व्यावसायिक नीतिमत्तेला सोडून होईल.'' आम्ही त्यांना सांगितले. तास संपल्यानंतर सरांना निरोप द्यायची वेळ आली. सर वर्गाच्या बाहेर पडले. आम्हीसुद्धा त्यांच्या मागे बाहेर पडलो, पण त्यांची आणि आमची पावले बराच वेळ वर्गाजवळच घुटमळत राहिली.

**अनंताचा साक्षात्कार घडवणारे गुरू :**

कथाकार, कादंबरीकार आणि समीक्षक म्हणून सुप्रसिद्ध असलेल्या साहित्यिक कुसुमावती देशपांडे यांची शिक्षकांवरील 'अनंताचा साक्षात्कार' ही एक सुंदर कविता मला वाचायला मिळाली. (पूर्वीच्या काळी शिक्षकांसाठी मास्तर हा शब्द सर्रास वापरला जायचा. त्यामागे अनादराची भावना मुळीच नसायची. श्री. म. माटे आणि प्रा. ग. प्र. प्रधान हे माटे मास्तर आणि प्रधान मास्तर म्हणूनच प्रसिद्ध आहेत.)

*एखादा मास्तर असा भेटतो*
*शाळेची जाम भीती घालतो*

*उठता बसता मारतो छडी*
*थरथर कापतात चिमणे गडी*

*विद्यार्थी? छे, गोगलगाय*
*जीवनभर पोटात पाय!*

*सदा न् कदा छडी हाती*
*शाळेची, जीवनाची भीतीच भीती*

*एखादा मास्तर असा भेटतो*
*उस्ताद नसला तरी वस्ताद असतो*

*प्रत्येक चोरवाटेची चावी*
*या पठ्ठ्याला अचूक ठावी*

*कुणापुढे वाकावं, कुणा लाथ मारावी*
*पैसे कसे पचवावे, कॉपी कशी करावी*

*साऱ्या विद्यांचे शिक्षण*
*सदा देतो सोदाहरण*

*एखादा मास्तर असा भेटतो –*
*जो ज्ञानाचे पंख देतो*

*सात स्वर्गाचे दार उघडतो*
*घरटं बांधायला तोच शिकवतो*

*घरटं उबदार पिलं शानदार*
*आभाळातून सारं सांभाळते घार*

*आभाळाचं मन काही*
*पिलांना ती देत नाही*

*नजर तीक्ष्ण एकच लक्ष्य*
*भक्ष्य भक्ष्य आणखी भक्ष्य !*

*एखादाच मास्तर असा भेटतो –*
*डोक्यात घट्ट रुतवून ठेवतो,*

*भव्य स्वप्नाचा दिव्य बाण !*
*अंतर्वेधी दृष्टी त्याची*
*पंखात घालते पंचप्राण !*

*पंख देतो, देतो शक्ती*
*नाही देत थिजली शांती*

*आकाशातून हिंडत असता*
*भूमीवर खिळवी दृष्टी*
*नजर नेहमी असतेच त्याची*
*खुरडणाऱ्या पायांवर*
*दिगंतातून हिंडता हिंडता*
*दाखवीत असता विश्वाकार*
*एखादाच गुरू घडवी*
*अनंताचा साक्षात्कार*

आपल्या विद्यार्थ्यांना अनंताचा साक्षात्कार घडवणाऱ्या गुरूंना विनम्र अभिवादन आणि शिक्षक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !

◈◈◈

# शिक्षकत्वाचे एव्हरेस्ट - बॅ. पी. जी. पाटील

**शिवाजी तांबे**
निवृत्त शिक्षण संचालक,
महाराष्ट्र राज्य
भ्रमणध्वनी : ९४०४४१६१०३

*बॅ. पी. जी. पाटील हे महाराष्ट्राच्या शिक्षणक्षेत्रातील उत्तुंग व्यक्तिमत्त्व. कर्मवीर अण्णांच्या सानिध्यात त्यांचे शिक्षण झाले. पुढे त्यांचाच वारसा त्यांनी चालवला. लेखक शिवाजी तांबे यांना पी. जी. पाटील सरांचा सहवास लाभला, त्या सहवासातून, संवादातून पी. जी. सरांच्या व्यक्तिमत्त्वाचा, विचारांचा, संस्काराचा प्रभाव त्यांच्यावर पडला. विविध टप्प्यावरील सरांच्या आठवणी आणि त्यांच्या अलौकिक व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये, त्यांची इंग्रजी अध्यापनाची वैशिष्ट्ये या बाबी विस्ताराने मांडल्या आहेत. पी. जी. सरांच्या उत्तुंग वाटचालीचा परिचय करून देणारा समृद्ध लेख.*

विद्यार्थिदशेबरोबरच अवघे आयुष्य प्रकाशमान करणारे शिक्षक लाभणे हा जीवनातील फार मोठा योग असतो. माझ्यासारख्या सर्वसामान्य विद्यार्थ्याच्या जीवनात हा योग आला, तो माझे प्राचार्य बॅरिस्टर पी. जी. पाटील सरांमुळे !

पी. जी. पाटील सरांच्या अगोदरही मला काही चांगले शिक्षक लाभले, ते सातारा जिल्ह्यातील महिमानगडच्या जीवन शिक्षण विद्या मंदिरात ! त्यांपैकी एक म्हणजे अंक-अक्षरांच्या पाऊलवाटेने मला शिक्षणाच्या मार्गावर नेणारे पहिलीचे शिक्षक गणेश राजाराम कुलकर्णी गुरुजी. ते अतिशय प्रेमळ आणि उत्कृष्ट शिक्षक होते. अत्यंत कडक शिस्तीच्या रामचंद्र अण्णा जगदाळे गुरुजींविषयीसुद्धा माझ्या मनात अतीव आदर आहे. भाषा, गणित आणि इतिहास या विषयांवर त्यांचे विलक्षण प्रभुत्व होते. हातात कोणतेही पुस्तक वा टिपण न घेता, ते अत्यंत ओघवत्या भाषेत परिणामकारक अध्यापन करायचे. कमावलेला आवाज आणि प्रभावी कथनशैली हा त्यांच्या अध्यापनाचा खास विशेष. सातत्यपूर्ण सरावातून अभ्यास पक्का करून घेणाऱ्या बा. ता. घाडगे गुरुजींनाही माझ्या शालेय जीवनात मोठे महत्त्वाचे स्थान आहे. या आणि अशा सर्व शिक्षकांनी अभ्यासक्रम आणि पाठ्यपुस्तकांच्या अनुषंगाने आमची चांगली तयारी करून घेतली होती; परंतु पाठ्यपुस्तकाच्या पलीकडील ज्ञानाच्या अथांग आकाशाचे दर्शन घडवले, ते प्राचार्य बॅरिस्टर पी. जी. पाटील सरांनी ! बॅरिस्टर पी. जी. पाटील सर म्हणजे कर्मवीर भाऊराव पाटील यांचे मानसपुत्र !

अद्वितीय यशामुळे लाभलेली वलयांकित विद्यार्थिदशा आयुष्यभर मनापासून जोपासलेले शिक्षकत्वाचे व्रत, अफाट व्यासंग, विद्यार्थ्यांविषयी अपार प्रेमभाव, मूल्याधिष्ठित जीवनशैली, जाज्वल्य देशप्रेम आणि कर्मवीरांच्या विचारांवरील अढळ निष्ठा हे पी. जी. सरांच्या व्यक्तिमत्त्वाचे मोठे विलोभनीय पैलू होते; म्हणूनच त्यांचे व्यक्तिमत्त्व हे विद्यार्थ्यांसाठी प्रेरणेचा अखंड ऊर्जास्रोत राहिले.

पी. जी. सरांनी १९७२-७३ साली आमच्या न्यू इंग्लिश स्कूल महिमानगड या विद्यालयास भेट दिली होती. तेव्हा ते रयत शिक्षण संस्थेचे मानद सचिव

होते. हेच पी. जी. सरांचे पहिले दर्शन. पुढे १९७४ साली एस. एस. सी. झाल्यावर मी छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा येथे प्रवेश घेतला, तेव्हा तेच आमचे प्राचार्य होते. ते मला प्राचार्य म्हणून फार काळ लाभले नाहीत. थोड्याच दिवसांत ते शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू झाले; परंतु पी. जी. सर कॉलेजमध्ये नसतानासुद्धा त्यांच्या अभ्यासाच्या प्रदीर्घ बैठकीच्या, विस्मयकारक स्मरणशक्तीच्या, अद्भुत पाठांतराच्या आणि एकापाठोपाठ एक मिळालेल्या उत्तुंग यशाच्या प्रेरककथा शिवाजी कॉलेजच्या आवारात सदैव चर्चिल्या जात असत. विद्यार्थिदशेतील त्यांच्या लखलखत्या यशोगाथा या विद्यार्थ्यांसाठी प्रेरक ऊर्जेचे अक्षय भांडार होत्या. पी. जी. सरांची उज्ज्वल यशाने तळपणारी विद्यार्थिदशा ही एकप्रकारे विद्यार्थ्यांसाठी प्रेरक मार्गदर्शकाची भूमिका बजावत असे.

पी. जी. पाटील म्हणजे, कर्मवीरांनी कवलापूर गावच्या भूमीत शोधलेला कोहिनूर ! धनिणीच्या बागेतील शाहू बोर्डिंगमध्ये आणून कर्मवीर अण्णांनी त्याला नियोजनपूर्वक पैलू पाडले. पुढे त्यांना इंग्रजीचे ख्यातनाम प्राध्यापक डॉ. व्ही. के. गोकाक यांच्या अतिशय कुशल हाती फिनिशिंगसाठी सोपवले आणि इंग्लंडला गेल्यावर रयतेचा हा अनमोल हिरा प्रखर ज्ञानतपश्चर्येने अधिक तेजस्वी बनला.

पी. जी. म्हणजेच, पांडुरंग गणपत पाटील हे अगदी सामान्य कुटुंबात जन्मलेले. सहावीत असताना त्यांनी संपादित केलेले 'बालतरंग' हे मासिक कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पाहण्यात आले. ते या मुलाशी बोलले. त्यांना त्यांच्या कुशाग्र बुद्धिमत्तेचा अंदाज आला. कर्मवीरांनी आपल्या खांद्यावरून पुढील शिक्षणासाठी त्यांना सातारच्या शाहू बोर्डिंगमध्ये आणले.

कोल्हापूरमध्येच सहावीची परीक्षा झाली होती. सातवीला पांडुरंग पाटील साताऱ्यात आले. एका छोट्याशा खेड्यातून जिल्ह्याच्या मोठ्या गावी आले. सर्व जाती-धर्मांच्या मुलांबरोबर शाहू बोर्डिंगमधील झोपडीत राहू लागले. तेथे शाळा आणि अभ्यासाबरोबरच शेतीची कामे करावी लागत. पाळीनुसार स्वयंपाक करावा लागे. भांडी घासावी लागत. स्वतःचे कपडे स्वतः धुवावे लागत. झोपडी आपली आपण स्वच्छ करावी लागत असे. सगळे जीवनच बदलून गेले होते. साताऱ्यातील हे पहिलेच वर्ष होते आणि याच वर्षी (१९३५) व्ह. फा. परीक्षा होती. ती खूप कठीण असायची. जंगम गुरुजींसारखे चांगले शिक्षक लाभले होते, तरीही शाळेचा निकाल फक्त १०% लागला होता. त्यात पांडुरंग पाटील त्या वेळच्या मुंबई इलाख्यातील दहा जिल्ह्यांत पहिले आले होते. याच वर्षी ते हायस्कूल स्कॉलरशिप परीक्षेतही पहिले आले. शाहू बोर्डिंगच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आणि सरांच्या भावी यशोमालिकेचा प्रारंभ झाला.

इंग्रजी चौथीत असतानाच कर्मवीरांनी सरांना दोन गोष्टी सांगितल्या होत्या. त्यापैकी एक म्हणजे, तुला राजाबाई टॉवरशी कुस्ती करायची आहे आणि दुसरी म्हणजे बी. ए. झाल्यावर मी तुला शिक्षणासाठी परदेशी पाठवणार आहे. कर्मवीर अण्णा मुलांशी जे बोलायचे ते करायचे.

शाहू बोर्डिंगच्या वातावरणात पी. जी. सरांनी मॅट्रिकचा अभ्यास केला. सकाळी चार-साडेचारला उठायचे. आवरून रॉकेलच्या चिमणीच्या उजेडात दोन-अडीच तास अभ्यास करायचा. सकाळी नाष्टा करायचा. आपल्या वाटणीची कामे करायची आणि जेवण करून शाळेत जायचे. संध्याकाळी आल्यावर स्वयंपाकाची पाळी असेल, तेव्हा सर्वांसाठी भाकरी, आमटी करायची. भांडी घासायची आणि संध्याकाळी जेवण झाल्यावर दोन-अडीच तास अभ्यास करायचा. 'कमवा आणि शिका' या योजनेच्या माध्यमातून शिक्षण घेत असताना त्यांनी मॅट्रिकला 'फर्स्ट क्लास वुईथ डिस्टिंक्शन' मिळवले.

बोर्डातील पहिला क्रमांक अगदी थोडक्यात हुकला. त्यांना संस्कृतचे ‘राजरत्न माने पाटील पारितोषिक’ मिळाले.

पी. जी. सर हायस्कूलमध्ये शिकत होते, तेव्हा डॉ. व्ही. के. गोकाक सर इंग्लंडला शिकायला चालले होते. तेव्हा कर्मवीरांनी त्यांना सांगून ठेवले होते, की परत आल्यावर मी माझा एक विद्यार्थी तुमच्याकडे इंग्रजी शिकायला पाठवणार आहे. पुढे पी. जी. सर मॅट्रिक झाले. गोकाक सर इंग्लंडहून परत आले आणि अण्णांनी पी. जी. सरांना त्यांच्याकडे सांगलीच्या विलिंग्डन कॉलेजमध्ये पाठवले. डॉ. गोकाक म्हणजे त्या काळातील इंग्रजीचे नामवंत प्राध्यापक! कन्नड भाषेतील ज्ञानपीठ विजेते साहित्यिक! कर्मवीरांनी पी. जी. सरांच्या शिक्षणासाठी केवढे नियोजन केले होते, हे लक्षात घेण्यासारखे आहे. विलिंग्डनमध्ये शिकत असताना इंटरला पी. जी. सर इंग्लिश विषयामध्ये मुंबई विद्यापीठात सर्वप्रथम आले. त्यांना प्रतिष्ठेचे ‘ह्युग्लिंग्ज’ प्राईज मिळाले. याच काळात १९४२ च्या लढ्यात सहभागी झाल्याने त्यांना तुरुंगवास झाला होता. ते जवळपास वर्षभर येरवड्याच्या तुरुंगात होते. त्यात त्यांचे एक वर्ष वाया गेले, परंतु त्यांनी त्याची फिकीर केली नाही.

पुढे गोकाक सरांनी विलिंग्डन सोडले. पी. जी. सरांना पुण्यात फर्ग्युसन कॉलेजला यावे लागले. तेथे ते कर्मवीरांनी सुरू केलेल्या युनियन बोर्डिंगमध्ये राहायचे. ते बी. ए. च्या परीक्षेत ‘कंपल्सरी इंग्लिश’मध्ये मुंबई विद्यापीठात सर्वप्रथम आले. त्यांना प्रतिष्ठेची ‘एलिस स्कॉलरशिप’ मिळाली. वरील दोन्ही पारितोषिके तो पर्यंत अँग्लो इंडियन अथवा पारशी विद्यार्थ्यांना मिळत होती. ही पारितोषिके मिळवणारे पी. जी. पाटील हे बहुजन समाजातील पहिले विद्यार्थी ठरले. पी. जी. सरांनी राजाबाई टॉवरबरोबरची कुस्ती जिंकली आणि कर्मवीरांचे स्वप्न पूर्ण केले.

सरांच्या या उत्तुंग यशाने कर्मवीर अण्णांना खूप आनंद झाला. त्यांनी पी. जी. पाटील यांची पाचगणीत महात्मा गांधीजींशी भेट घालून दिली. गांधीजींनी सरांच्या यशाचे कौतुक केले.

पी. जी. पाटील सर बी. ए. झाले. अण्णांनी त्यांची पुन्हा एकदा गांधीजींशी भेट घालून दिली. महात्मा गांधीजींचे आशीर्वाद घेऊन पी. जी. पाटील यांना बॅरिस्टर होण्यासाठी इंग्लंडला पाठवले. पी. जी. सर पाच वर्षे तेथे राहिले. बार अ‍ॅट लॉचा अभ्यास करताना सर्व मार्गांनी ज्ञानसाधना करत राहिले. तेथे त्यांनी विन्स्टन चर्चिल तसेच अनेक दिग्गजांची व्याख्याने ऐकली. महान इंग्लिश साहित्यिक मिल्टन, शेले, शेक्सपिअर, वर्डस्वर्थ यांच्या स्मृतिस्थळांना श्रद्धायुक्त अंतःकरणाने भेटी दिल्या. बॅरिस्टर होतानाच त्यांनी अर्थशास्त्र, राज्यशास्त्र आणि इंग्रजी हे विषय घेऊन किंग्ज कॉलेज लंडनमधून बी. ए. ची पदवी संपादन केली.

पाच वर्षे इंग्लंडमध्ये राहूनही पी. जी. सर इंग्रजी वातावरण आणि इंग्रजी संस्कृतीच्या थोडेही आहारी गेले नाहीत. आपली गोरगरीब माणसे, मराठी माती, संस्कृती, कर्मवीर अण्णा, गावाकडची आजी, साधी राहणी, शाहू बोर्डिंग आणि तेथील स्वावलंबन विसरले नाहीत.

कर्मवीर अण्णांनी पी. जी. सरांना संस्थेबाहेर चांगली नोकरी करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य दिले होते, तरीही त्यांनी अल्पवेतनावर रयत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये ट्यूटर म्हणून नोकरी सुरू केली. कर्मवीरांनी आपल्या स्वतःच्या मुलांच्या शिक्षणाकडे किंवा लग्नाकडे फारसे लक्ष दिले नाही, परंतु आपल्या बोर्डिंगमध्ये शिकलेल्या मुलांची लग्नं पुढाकार घेऊन ठरवली. साध्या पद्धतीने लावली आणि त्यांचे संसार मार्गी लावले. पी. जी. सरांच्या बाबतीतही असेच घडले. कर्मवीरांना त्यांचे वर्गमित्र डॉ. चव्हाण यांच्या कन्येविषयी समजले.

विशेष म्हणजे ती डॉ. व्ही. के. गोकाक यांची आवडती विद्यार्थिनी होती. लग्न जमले. धनिणीच्या बागेत लग्न झाले. त्या वेळी हॉस्पिटलमध्ये असतानाही डॉक्टरांची परवानगी घेऊन अण्णा लग्नाला आले. पुढे पी. जी. सर आणि सुमतीबाई पाटील मॅडम छत्रपती शिवाजी कॉलेजवर प्राध्यापक म्हणून काम करू लागले. दोघांनी बरोबर एम. ए. (इंग्लिश) चा अभ्यास केला. पुणे विद्यापीठात पी. जी. सर पहिले आणि सौ. सुमतीबाई पाटील मॅडम दुसऱ्या आल्या. पुढे शिवाजी कॉलेजवर एम. ए. चे वर्ग सुरू झाले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली शेकडो विद्यार्थ्यांनी एम. ए. (इंग्लिश) केले. त्यांनी महाराष्ट्रातील पाच विद्यापीठांना इंग्रजीचे दोनशेहून अधिक प्राध्यापक दिले. तसेच महाराष्ट्राला शेकडो इंग्लिशचे शिक्षक दिले. पी. जी. सर आणि सुमतीबाई पाटील मॅडम म्हणजे भारतीय संस्कृतीच्या बैठकीवर उत्तरोत्तर रंगत गेलेली इंग्लिश वाङ्मयाच्या व्यासंगाची मैफील!

१९८१ साली ऑगस्टमध्ये मी छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये हिंदी विषयाचा लेक्चरर म्हणून रुजू झालो. त्याच वर्षी पी. जी. सरांच्या एकसष्टीच्या कार्यक्रमाचे मोठ्या उत्साहात नियोजन सुरू होते. दोन गौरवग्रंथ तयार करण्याचे काम नुकतेच सुरू झाले होते. एक होता शिक्षण आणि साहित्यविषयक 'त्रिदल' हा संदर्भ ग्रंथ. त्याचे प्रमुख संपादक होते इंग्रजीचे प्राध्यापक डॉ. एम. ए. शेख. दुसरा 'उदयंती' हा ग्रंथ सरांच्या व्यक्तिमत्त्व आणि कर्तृत्वावर आधारित लेखांचा होता. त्याचे प्रमुख संपादक होते आमच्या हिंदी विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. शिवराम माळी. या ग्रंथासाठी १११ लेख प्राप्त झाले होते. त्यांचे संपादन डॉ. माळीसर करत होते. मी त्यांचा विद्यार्थी होतो, सहकारी होतो. माझ्याकडे भरपूर रिकामा वेळ होता. त्यामुळे संपादित लेखावरून प्रेस कॉपी तयार करण्याची जबाबदारी माळीसरांनी माझ्याकडे सोपवली. संपादित झालेले सर्व लेख मी पुन्हा लिहून काढत होतो. संपादनाची मुळाक्षरे न्याहाळत होतो. कामात आनंद मिळत होता. या काळात पी. जी. सरांचे शिक्षकत्व अधिक जवळून उमगत गेले. एक शिक्षक म्हणून सुरू झालेल्या माझ्या वाटचालीत मला त्या लेखांमधून शिक्षकत्वाचे उत्तुंग एव्हरेस्ट भेटत होते. अधूनमधून माळीसरांबरोबर पी. जी. सरांकडे जाणे होत होते. त्यांच्यातील चर्चा मी ऐकायचो. या कामामुळे पी. जी. सर आणि प्राचार्या सुमतीबाई पाटील मॅडम यांच्या भेटीगाठी होत गेल्या. त्यांच्या सहवासात मी अनेक गोष्टी शिकत गेलो. याच दरम्यान पी. जी. सर आणि माळीसरांबरोबर कोल्हापूरचा दौरा करता आला. त्या वेळी पी. जी. सरांची मानवतावादी दृष्टी, सौजन्यशीलता, विनयशीलता अनुभवता आली. सर इंग्रजीचे नामवंत प्राध्यापक होते, प्रशासन कुशल प्राचार्य होते, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू होते आणि त्याच वेळी ते महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे सदस्यही होते; परंतु या सगळ्या पदांच्या मोठेपणाचा लवलेशही सरांच्या वागण्या-बोलण्यात कधी आढळला नाही.

पी. जी. सरांचा इंग्लिश भाषेचा आणि साहित्याचा व्यासंग खूप मोठा होता. त्याचा पाया त्यांच्या विद्यार्थिदशेतच घातला गेला होता. शिक्षक म्हणूनही पुढचे आयुष्य त्यांनी इंग्लिश भाषा व साहित्याबरोबर, संस्कृत साहित्य, मराठी साहित्य, संत साहित्य, इतिहास, समाजकारण यांसारख्या विषयांच्या अध्ययनात, चिंतनात वेचले होते. नामवंतांच्या व्याख्यानांचे श्रवण, अखंड वाचन, चिंतन अशा अविरत साधनेतून बहरलेला व्यासंग वर्गात चहुअंगाने फुलत राहायचा. नेमके संदर्भ आणि त्यावरील मार्मिक चिंतन यांमुळे प्रतिपाद्य विषयाच्या 'बिटवीन द लाईन्स' मधील अकथित आशय वर्गात सहजपणे प्रकट होत असे. त्यामुळे विद्यार्थ्यांना विषयाचे आकलन व्हायला वेळ लागायचा नाही.

**(पृष्ठ क्र. २७ वर)**

# बाल मुखावरील हास्य... हाच खरा शिक्षक पुरस्कार!

**डॉ. गोविंद नांदेडे**
पूर्व शिक्षण संचालक, पुणे.
भ्रमणध्वनी : ८६९८९०६९०६

*५ सप्टेंबर रोजी देशात सगळीकडे शिक्षक दिन साजरा केला जातो. या दिवशी अनेकांना आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित केले जाते. विद्यार्थी हेच आपले दैवत मानून कितीतरी शिक्षक विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी झटत असतात. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि त्यांच्यातील चैतन्याचे जागरण हाच त्यांना पुरस्कार वाटतो. व्यवस्थेविषयी कसलीही तक्रार न करता आपण स्वीकारलेले कार्य सचोटीने करणे यातच ते धन्यता मानतात. अशा सर्व शिक्षकांविषयी आदर व्यक्त करणारा चिंतनशील लेख.*

५ सप्टेंबर शिक्षक दिन. विश्वविख्यात शिक्षणतज्ज्ञ डॉ. राधाकृष्णन यांची जयंती देशभर शिक्षक दिन म्हणून साजरी केली जाते. राष्ट्राचे भवितव्य शाळेच्या वर्गखोल्यांतून आकारास येत असते. शिक्षक हे त्या भवितव्याचे शिल्पकार असतात. तो देश विश्वात अग्रगण्य मानला जातो, ज्या देशातील नागरिक संपन्न चारित्र्याचे असतात. ज्या देशातील लोक कठोर परिश्रम करून अहर्निश राष्ट्राच्या भवितव्याला आकार देत असतात. ज्या देशवासीयांना आपल्या राष्ट्राचा अभिमान असतो, ज्या देशातील नागरिकांची राष्ट्रासाठी सर्वस्वाचे समर्पण करण्याची तयारी असते. आणि प्रामाणिकपणा, वक्तशीरपणा, राष्ट्रप्रेम ही मानवी जीवनमूल्ये ज्या देशातील नागरिकांच्या वर्तनात आढळून येतात तो देश वेगाने प्रगती करत असतो.

प्रामाणिकपणा, वक्तशीरपणा, राष्ट्रप्रेम ही मानवी जीवनमूल्ये केवळ शाळेतूनच बालमनावर संस्कारित होतात. ज्या शिक्षकांच्या संस्कारातून विद्यार्थ्यांच्या वर्तनात मानवी जीवनमूल्ये मूर्त होतात, त्या शिक्षकांचे सामर्थ्य अतुलनीय असते. असे शिक्षक जेव्हा सकाळच्या प्रसन्न वातावरणात वर्गात प्रवेश करतात, तेव्हा सर्व वर्ग प्रसन्न आणि प्रफुल्लित होऊन 'एक साथ नमस्ते!' म्हणतो. अशा शिक्षकांचे केवळ वर्गातील अस्तित्वही अवघ्या वर्गाच्या मनोभूमिकेत चैतन्याचे नवांकुर रुजवत असते. असे शिक्षक विद्यार्थी जीवनात 'आनंदाचा डोह' निर्माण करत असतात. वर्गात कितीही विद्यार्थी असले, तरी उपक्रमशील आदर्श शिक्षक शंभर टक्के विद्यार्थ्यांच्या जीवनात आमूलाग्र परिवर्तन घडवून आणतात.

काय जादू करतात बरे असे शिक्षक? असे खऱ्या आदर्शाचे वारसदार शिक्षक सदैव प्रसन्न मनाने शाळेच्या प्रांगणात आणि वर्गात प्रवेश करतात. जगद्गुरू संत तुकोबारायांच्या शब्दांत 'मन करा रे प्रसन्न। सर्व सिद्धीचे कारण।।' असे प्रसन्न मनाचे सर्जनशील शिक्षक वर्गात आले रे आले, की वर्गसागरावर चैतन्याची लाटच तरंगायला लागते. संत तुकोबाराय म्हणतात, प्रसन्न मनाच्या व्यक्तिमत्त्वामध्ये अष्टसिद्धी साकार होतात.

शिक्षकदिनी शिक्षकांना पुरस्कार प्रदान केले जातात. ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, राज्य–शासन, केंद्र शासन, स्वयंसेवी संस्था या सर्व सार्वभौम शासन व्यवस्था आणि संस्था शिक्षकांचा गौरव करतात. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी धडपडणारे शिक्षक सन्मानाचे मानकरी असतातच. शहरात, तालुक्याच्या गावी विद्यार्थी घडविण्यासाठी शिक्षक धडपडतात. विविध उपक्रम राबवतात. हे करत असताना त्यांना बऱ्याच

भौतिक सुविधा उपलब्ध असतात; पण अशा कोणत्याही सुविधा नसताना तळमळीने, भौतिकसुखाचा विचार न करता आपल्या विद्यार्थ्यांच्या विकासासाठी धडपडत असतो, खेड्यापाड्यांतून, वाडीतांड्यांतून, गाववस्त्यांवर उत्तम शैक्षणिक कार्य करणारा एक मोठा शिक्षक वर्ग, पंचायत समिती, जिल्हा परिषदेकडे ते फिरकतही नाही. त्यांची आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची ओळखही नसते. तशी स्वतः होऊन अशा वरिष्ठ अधिकाऱ्यांची ओळख करून घेण्याची त्यांना गरजही वाटत नाही. अशा मनस्वी, कष्टाळू, कल्पक प्रतिभेच्या सर्वोत्तम शिक्षकांना अशा सरकारी अधिकाऱ्यांकडून काही प्राप्तही करायचे नसते. आपला वर्गातील विद्यार्थी हाच त्यांचा सर्वांत मोठा अधिकारी असतो. त्यांच्या कार्याचे मूल्यमापन करणारा त्यांचा विद्यार्थी हाच त्यांचा न्यायाधीश असतो. अशा त्या-त्या दुर्गम भागात आपल्या कर्तव्यांप्रति सजग असलेले उपक्रमशील गुणी शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांना आपले सर्वस्व समजतात.

शिक्षणाला आणि आपल्या विद्यार्थ्यांच्या हिताला जिवापाड जपणाऱ्या शिक्षकांना सगळा गाव प्राणांपेक्षा अधिक जपत असतो. शिक्षकांच्या सुखदुःखांत गाव त्यांच्या पाठीशी असतो. अशा सर्वोत्तम शिक्षकांचे अध्यापन-अध्ययन प्रेरित आणि विद्यार्थिकेंद्रित असते. प्रतिभा आणि प्रज्ञा ही विद्यार्थ्यांमध्ये अंतर्निहीत असतेच; पण गरज असते त्या प्रतिभेला आणि प्रज्ञेला पैलू पाडण्याची. असे गुणवंत शिक्षक प्रत्येक विद्यार्थिरूपी कोहिनूर हिऱ्याला सूक्ष्म पैलू पाडण्यात गर्क असतात. ते आपल्या सात्विक कार्यात सदैव कार्यमग्न असतात. अशा गुणवंत, सर्वोत्कृष्ट शिक्षकांना आपल्या विद्यार्थ्यांच्या हिताशिवाय दुसरे काहीही सुचत नाही. आपल्या जीवनाची ही सकारात्मक दिशा ते दमदार पावले टाकीत अविरत चालत राहतात. स्वयंसिद्ध विद्यार्थी घडवत असतात.

विद्यार्थी विकासासाठी जे जे म्हणून करण्याची आवश्यकता असते, ते ते सारे मन लावून करतात. शिक्षणातील नवप्रवाह, नवे सिद्धांत, नवे तत्त्वज्ञान, अवगत करण्याचा त्यांचा प्रामाणिक प्रयत्न असतो. एखाद्या प्रशिक्षणाला जातात तेव्हा अशा कर्मयोगी शिक्षकांची कधी कोणती तक्रार नसते. वरण पातळ होते, पंखा नीट चालत नव्हता, गरम पाणी मिळाले नाही अशा भौतिक गरजांबाबत त्यांची कधीच कुरकूर नसते. प्रशिक्षणातून मला माझ्या विद्यार्थ्यांसाठी काय घेऊन जाता येईल, याचाच ते विचार करतात. अशा सकारात्मक सद्‌गुणांचे हजारो शिक्षक 'विद्यार्थी हेच दैवत' मानून त्यांच्या असाधारण प्रगतीचा ध्यास घेत अहर्निश कार्य करत असतात.

शिक्षणक्षेत्रातील विराट व्यवस्थेतील अशा सत्त्वगुणी शिक्षकांचे विद्यार्थी तर्क, अनुमान, आकलन, उपयोजन विश्लेषण आणि संश्लेषण यांच्या अगदी वरच्या टप्प्यावर असतात. त्यांना शाळा डिजिटल करण्यासाठी सारा गाव हात जोडून मदत करतो. लोकच अशा प्रामाणिक, शालीन आणि संवेदनशील शिक्षकांना वर्गखोल्यांपासून सर्व भौतिकसुविधा तत्परतेने पुरवितात. गुणवत्तावाढीचा ध्यास घेऊन विद्यार्थी घडवणाऱ्या या शिक्षकांना शिष्यवृत्तीसारख्या प्रज्ञा परीक्षांची वेगळी तयारीदेखील करावी लागत नाही. त्यांच्या दैनंदिन ज्ञानरचनापद्धतीच्या अद्वितीय अध्यापन-अध्ययनातून ती तयारी होतच असते. अशा उत्तम गुरुवर्यांना ध्यास असतो, तो वर्गातील प्रत्येक बालकाच्या, सर्वांगीण प्रगतीचा आणि ते आसुसलेले असतात आपल्याच निरागस बालकांच्या चेहऱ्यावरील निर्मळ हास्यासाठी. ते हास्यच अशा शिक्षकांसाठी सर्वश्रेष्ठ पुरस्कार असतो. वंदन अशा राष्ट्रभक्त शिक्षकांना...!

*चंदनाचे हात पायही चंदन ।*
*परिसा नाहीं हीन कोणी अंग ।।१।।*
*दीपा नाहीं पाठीं पोटीं अंधकार ।*
*सर्वांगे साकर अवघी गोड ।।२।।*
*तुका म्हणे तैसा सज्जनापासून ।*
*पाहतां अवगुण मिळेची ना ।।३।।*

# ।।तस्मै श्री गुरवे नमः।।

**डॉ. न. म. जोशी**
भ्रमणध्वनी : ९२२६५७५२९०

*आपल्या जीवनाच्या जडणघडणीत गुरू, शिक्षक यांची भूमिका फार महत्त्वाची असते. गुरू हे तत्त्वज्ञ, मार्गदर्शक आणि मित्र असतात. सुप्रसिद्ध साहित्यिक, शिक्षणतज्ज्ञ व वक्ते डॉ. न. म. जोशी आपल्या गुरुजनांविषयी अनुभवसिद्ध विवेचन करत आहेत.*

बालपणापासून अनेक श्लोक, स्तोत्रे, कविता, पाढे यांचे पाठांतर आमची पिढी करीत आली आहे. त्यांतीलच एक सुवचन आज शिक्षक दिनानिमित्त उद्धृत करतो.

*'गुरुर्ब्रह्मा, गुरुर्विष्णु, गुरुर्देवो महेश्वरः*
*गुरुःसाक्षात् परब्रह्म, तस्मै श्री गुरवे नमः।'*

'गुरू म्हणजे केवळ ब्रह्मा, विष्णु, महेश नव्हेत, तर ते साक्षात परब्रह्म आहेत, म्हणून त्या महान गुरूला नमस्कार असो.' असे हे वचन सांगते.

माझ्या अध्ययनकाळात मला अनेक चांगले गुरू लाभले. उत्तम शिक्षक मिळाले, किंबहुना आम्हांला लाभलेले सर्वच शिक्षक हे आमचे 'शिल्पकार' होते; पण त्यांतील काही निवडक आणि वैशिष्ट्यपूर्ण शिक्षकांचा शब्दालेख सादर करतो.

## जेरे मास्तर :

माझे बालपण सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील, गारवडे नावाच्या दूरस्थ खेडेगावात गेले. तेथील प्राथमिक शाळेत मी शिकलो. शाळेला स्वतंत्र इमारत नव्हती. शाळा देवळात भरायची. अनेक वर्ग विठ्ठलाच्या देवळात भरत. तर एक वर्ग जोतिबाच्या देवळात. जेरे मास्तर नावाचे आमचे मास्तर... तीन वर्गांना एकच मास्तर शिकवायचे, पण मास्तर कधी कातावलेले, कंटाळलेले किंवा त्रस्त असलेले मी पाहिले नाहीत. एका वर्गाला अभ्यास देऊन, दुसऱ्या वर्गाला नवीन पाठ शिकवायचे. तिसऱ्या वर्गाला उजळणी करायला सांगायचे. आम्ही त्यांच्या डोळ्यांच्या धाकात होतो; पण शिस्तीसाठी वटारलेल्या त्यांच्या डोळ्यांत मायाही भरपूर होती.

*'कावळा म्हणे मी काळा, पांढरा शुभ्र तो बगळा*
*पैशाचा साबू आणुनी, खडकावर घाशित बसला कावळा'*

ही कविता मास्तर खणखणीत आवाजात म्हणत आणि आम्हांलाही म्हणायला लावत. या कवितेतले शब्द कितीही साधे असले, तरी त्यातले जीवनविषयक तत्त्वज्ञान आयुष्यभर लक्षात राहणारे होते आणि उघड्या डोळ्यांनी जीवनव्यवहार जाणणारे होते. कावळा काळा असतो. बगळा पांढरा असतो. बगळ्यासारखे पांढरे होण्यासाठी अंगाला साबण लावून कितीही अंग घासले, तरी कावळा काळाच राहणार आणि बगळा पांढराच असणार. आज आयुष्याच्या संध्याकाळीही जेरे मास्तरांनी शिकविलेल्या त्या कवितेचा अर्थ सतत आठवतो आणि आयुष्य आहे तसे आनंदाने स्वीकारण्याची तयारी होते.

त्यावेळी कोणत्याच शाळेत, आजच्या शाळेत असतात, तशा शैक्षणिक सुविधा नव्हत्या; पण जेरे

मास्तर आमच्या शाळेभोवती आणि गावाच्या परिसरात असलेल्या निसर्गरम्य शाळेत नेऊन आम्हांला शिकवत असत. आम्ही पावसाची कविता पावसातच शिकलो. स्वतः मास्तर आमच्याबरोबर पावसात भिजत होते. साने गुरुजींचा एक पाठही आम्ही त्याच प्रभातकाली मंदिराच्या आवारात शिकलो. 'गुराख्याचे गाणे' ही कविता शिकवताना मास्तर आम्हांला खरोखरीच गायरानात घेऊन गेले होते आणि तिथे त्यांनी खऱ्याखुऱ्या गुराख्याशी आमची भेट घडवली होती. त्याने आम्हांला बासरीवर एक गाणेही वाजवून दाखविले होते.

जेरे मास्तरांना गावच्या एका गृहस्थांनी त्यांच्या एका मोठ्या, मोकळ्या वाड्यात राहायला जागा दिली होती. मास्तरांचे कुटुंब लहान; ते, त्यांच्या पत्नी कमलाबाई आणि मुलगा उमाकांत. वाड्यात जागा भरपूर, त्यामुळे अभ्यासात कच्ची असलेली मुले रात्री कंदील घेऊन मास्तरांच्या घरीच अभ्यासाला येत. रात्री तिथेच झोपत. अशी ही मास्तरांची रात्रीची कंदीलशाळा कितीतरी वर्षे चालू होती. माझेही गणित कच्चे होते. मी दोन महिने रात्री मास्तरांच्या घरी कंदील घेऊन झोपायला जात होतो. त्या काळी गावात वीज आलेली नव्हती. रात्री सर्व व्यवहार कंदिलाच्या प्रकाशात होत. मास्तरांची कंदीलशाळा म्हणजे गारवड्यातील आम्हा मुलांचा मोठा आधार होता. माझ्याबरोबर अशा कंदीलशाळेत शिकलेले कितीतरी विद्यार्थी पुढे आपापल्या क्षेत्रांत उत्तम जम बसवून काम करू लागले.

अभ्यासाबरोबरच जेरे मास्तरांनी आम्हांला श्रमप्रतिष्ठेचेही धडे दिले होते. आधी शाळा देवळात भरे, पण मग लोकल बोर्डाने गारवडे आणि बहुले या दोन गावांच्या मध्यावरील माळावर नवीन शाळा बांधून दिली. बांधून दिली म्हणजे काय... विटांच्या चार भिंती आणि वर पत्र्याचे छप्पर! आतमध्ये विटांच्या भिंती घालून वर्गखोल्या पाडलेल्या! भयंकर उकाडा, खाली नुसती जमीन, तीही सपाट नाही. बस्करं घालून आम्ही बसलो, तरी जमिनीतले उंचवटे टोचायचे. भोवती उघडाबोडका माळ! मग मास्तरांनी आम्हांलाच कामाला लावले. आणखी दोन शिक्षक नवीन आलेले. ठोंबरे गुरुजी आणि चौगुले गुरुजी. आम्ही सर्व मुलांनी वर्गातली जमीन उकरून, शेणसडा घालून चोपण्याने ती चोपली. भुई गुळगुळीत झाली. या सर्व कामात जेरे मास्तर स्वतः धोतराचा काचा मारून आमच्याबरोबर जमीन चोपायला होते. जमिनीचे काम झाल्यावर शाळेभोवती चहूबाजूला माती खणून आळे तयार करून त्यामध्ये पन्नास–साठ बिया पेरल्या. पाणी कुठले? आम्ही सर्वांनीच कळशा आणि बादल्या घेऊन ओढ्याचे पाणी आणून काही दिवस आळ्यांमध्ये घातले. अंकुर फुटले, रोपे तरारली, त्यात काही वेली होत्या. त्या वेली शाळेच्या पत्र्याच्या छपरावर चढविल्या, त्यामुळे उकाडा कमी झाला. दोन वर्षांत शाळेभोवती हिरवाई दिसू लागली. त्या बोडक्या माळावर आमची शाळा म्हणजे एक हिरवेगार बेटच झाली. याचे सारे श्रेय जेरे मास्तरांना जाते. त्यानंतर पुढील शिक्षणासाठी गावात सोय नसल्याने, मी सोलापूरला मावशीकडे शिकायला गेलो; पण गारवड्याची शाळा आणि जेरे मास्तर यांची मला कायम आठवण येत असे. आजही जेरे मास्तरांची प्रतिमा मनःपटलावर कोरलेली आहे.

### नी. वा. किंकर सर :

मी मावशीकडे शिकायला होतो. माझ्या मावशीचे मिस्टर ट्रेझरी ऑफिसर होते. त्यांची सतत बदली होत असे. मग माझी शिक्षणयात्राही त्यांच्याबरोबरच बदलीच्या गावी होत असे. इयत्ता दहावीसाठी मी पुण्यात भावे हायस्कूलमध्ये दाखल झालो. पेरुगेट जवळची ही भव्य शाळा मला आवडली. मुख्याध्यापक होते नी. वा. किंकर सर!

सावळा वर्ण, सडपातळ देहयष्टी, प्रसन्न चेहरा, स्वच्छ धोतर, पांढरा सदरा, त्यावर निळा गळाबंद कोट, आणि कोटावर दोन्ही खांद्यावरून घेतलेले उपरणे आणि डोक्यावर काळी टोपी.

किंकर सर राऊंडला निघाले, की वर्ग शांत असायचा ते त्यांच्या धाकाने नव्हे, तर त्यांच्या प्रेमळ वागणुकीमुळे! ते आम्हांला इंग्रजी शिकवत. 'शेल्डी' आणि 'बायरन' हे त्यांचे आवडते कवी. एखादा धडा शिकवताना ते या कवींच्या कित्येक ओळी म्हणून दाखवत. किंकर सर विनोदी होते. वर्गात गडबड करणाऱ्या मुलांना त्यांच्या नावांवरून विनोद करून गप्प बसवत. उदा., आमच्या वर्गात भोपळे नावाचा विद्यार्थी होता. अतिशय खोडकर. त्याच्याबद्दल बऱ्याच तक्रारी होत्या. त्यासाठी एकदा किंकर सर वर्गात आले. भोपळेला उभे केले आणि म्हणाले, ''भोपळे, तुझ्याबद्दल बऱ्याच तक्रारी आहेत. यापुढे एकही तक्रार येता कामा नये आणि तक्रार आलीच, तर भोपळ्या, माझ्या ऑफिसात नेऊन तुझ्या बियान्‌बिया बाहेर काढीन.'' त्यांच्या या विनोदावर भोपळ्यासकट सर्व वर्ग हसला; पण एक मात्र झाले, भोपळेची वागणूक सुधारली. किंकर सरांची ही हसरी शिकवण नेहमी लक्षात राहणारी ठरली.

किंकर सरांचे आणखी एक वैशिष्ट्य होते. त्यांनी बँकेच्या चेकबुकासारखी चेकबुके छापून घेतली होती. हुबेहूब तशीच. म. ए. सो. विद्यालय, ज्ञानवर्धिनी बँक असे बँकेचे नाव (अशी कुठलीही बँक प्रत्यक्षात नव्हती.) कोणीही विद्यार्थी वाढदिवशी आशीर्वाद घ्यायला गेला किंवा उत्तीर्ण झाल्याबद्दल पेढे द्यायला गेला, की ते एक चेक फाडत असत. त्यावर Pay ..........., विद्यार्थ्याचे नाव : ............................................, आणि खाली रक्कम म्हणून Three sixty five cheerful days असे लिहून त्याखाली सरांची लफ्फेदार सही असे. प्रत्यक्ष पैशातील बक्षिसापेक्षा त्यांचे हे बक्षीस आम्हांला लाखमोलाचे वाटत असे.

किंकर सरांच्या सहृदयतेचा एक भावपूर्ण प्रसंग मुद्दाम सांगतो. १९५० साली मी दहावीत होतो. मावशीकडे राहूनच शिकत होतो. सहामाही परीक्षा झाली. निकाल चांगला लागला; पण ५ डिसेंबरला मी तापाने भयंकर फणफणलो. त्यावेळी आम्ही देशमुखवाडीत राहत होतो. काही केल्या ताप उतरेना. डॉक्टरांची औषधे सुरू होती. प्रचंड अशक्तपणा होता. दोन आठवड्यांनंतर माझे वडील आले. त्यांनी आणि माझ्या मावशीच्या मिस्टरांनी स्पेशालिस्ट डॉक्टर देशमुख यांना प्रकृती दाखवली. त्यांनी गंभीर चेहरा करून सांगितले, 'टायफॉइड'; म्हणजे मुदतीचा ताप, विषमज्वर! त्या वेळी विषमज्वरावर रामबाण औषध म्हणून 'क्लोरोमायसिटीन'ची इंजेक्शने देत, तशी ती मला दिली. पथ्य कडक. माझा ताप उलटला होता आणि ८१ दिवसांचा विषमज्वर झाला होता. माझ्या अंगात मुळीच त्राण नव्हते. विश्रांतीचीही आवश्यकता होती. एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात वार्षिक परीक्षा, पण मी अंथरुणाला खिळलेलो. पेन हातात धरवत नव्हते. शिवाय डिसेंबरपासून शाळा बुडलेली. अभ्यास बुडलेला. मला प्रचंड निराशा आली. आधीच मी आश्रित म्हणून शिकत होतो. त्यात वर्ष वाया जाणार. पुढील वर्षी मला मावशीचा आधार मिळेल की नाही याची शाश्वती नव्हती. त्या तिरीमिरीत मी किंकर सरांना एक पत्र लिहिले.

मा. मुख्याध्यापक किंकर सर,

मी दहावीचा विद्यार्थी नरसिंह महादेव जोशी विषमज्वराने अंथरुणाला खिळून आहे. मला वार्षिक परीक्षा देता येणार नाही, असे वाटते. मी गरीब विद्यार्थी आहे. मावशीच्या आश्रयाने शिकत आहे. माझे वर्ष वाया

जाईल याची मला खूप काळजी वाटते. आधीच मी आजाराला कंटाळलो आहे, त्यात हे अपयश. जीवन नकोसे वाटते. तुम्ही मला काही मदत करू शकता का? मार्गदर्शन करावे. उत्तरासाठी सोबत एक आण्याचे तिकीट पाठवले आहे.

तुमचा नम्र विद्यार्थी,
नरसिंह जोशी.

त्यावेळी एक आण्याच्या टपाल तिकिटात पत्र येत असे म्हणून मी तिकीट पाठवले आणि अचानक दोन दिवसांनी आमच्या शाळेचे हेडक्लार्क गणपतराव देशपांडे किंकर सरांचे एक पत्र घेऊन आमच्या देशमुखवाडीतील घरी हजर झाले. सरांनी पत्रात लिहिले होते :

प्रिय नरशा,

तुझे पत्र मिळाले. तुझी समस्या कळली. तू आधी आजारातून पूर्ण बरा हो. काळजी घे. अभ्यासाची चिंता करू नकोस. मुख्याध्यापक या नात्याने मी तुझ्या पाठीशी आहे. तुझ्यासारख्या गरीब विद्यार्थ्याने एक आण्याचे तिकीट पाठवण्याची आवश्यकता नव्हती. तिकीट परत पाठवले आहे. देशपांडे सर्व सांगतीलच. आशीर्वाद

तुझेच,
नी. वा. किंकर

देशपांडे यांनी येताना माझ्यासाठी आलेपाकाच्या वड्या आणल्या होत्या. जाताना देशपांडे म्हणाले, ''किंकर सर स्वतः पुढच्या आठवड्यात तुला भेटायला येणार आहेत,'' खरोखरीच पुढील आठवड्यात किंकर सर आमच्या घरी आले. ते चहा पीत नसत. त्यांनी फक्त अर्धा कप दूध घेतले आणि प्रेमभरल्या आवाजात ते म्हणाले, ''नरशा, अरे तुझ्या पत्राला कोणतेही लेखी उत्तर मी दिले नाही; कारण तसे मला आताच देता येणार नाही. तुझे सहामाही परीक्षेचे मार्क्स चांगले आहेत. आता एवढंच कर, तुमच्या डॉक्टरांचे एक सर्टिफिकेट माझ्याकडे पाठवून दे आणि निश्चिंत राहा.'

किंकर सरांनी मला मोठा दिलासा दिला होता. डॉक्टरांचे सर्टिफिकेट पाठवून दिले. मी परीक्षेला बसलो नाही. निकाल लागला. माझे वर्गमित्र पास झाले होते. माझा निकाल? मी तर परीक्षाच दिलेली नव्हती!

दुसऱ्याच दिवशी एक पत्र घेऊन शाळेचा शिपाई आला. पत्रात लिहिले होते. 'नरसिंह महादेव जोशी इयत्ता १० वी ब हा दीर्घ काळ आजारी आहे, त्यामुळे तो वार्षिक परीक्षेला बसू शकला नाही. सहामाही परीक्षेचा निकाल लक्षात घेऊन जोशी याला वरच्या वर्गात अकरावीत प्रवेश देण्यात येत आहे. सुट्टीनंतर शाळेत येताना डॉक्टरांचे फिटनेस सर्टिफिकेट आणावे.

नी. वा. किंकर,
मुख्याध्यापक

किंकर सरांचे मी मनोमन आभार मानले. असे सहृदय मुख्याध्यापक लाभण्याचे भाग्य सर्वांना लाभो!

**डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे सर :**

एस.एस.सी. पास झाल्यावर लगेचच एस.टी.सी. आणि सी.पी.एड हे दोन शिक्षक प्रशिक्षणाचे कोर्स पूर्ण केले, कारण मला नोकरीची आवश्यकता होती. त्याप्रमाणे प्रथम मिरज येथे आर.एम. हायस्कूलमध्ये एक वर्ष नोकरी करून मी पुण्यात आलो. अनेक शाळांत अर्धवेळ नोकरी करत मी स. प. महाविद्यालयात पदवीसाठी प्रवेश घेतला. मराठी हा प्रमुख विषय आणि इंग्रजी हा पूरक विषय घेऊन बी. ए. झालो. येथे नामवंत प्राध्यापक डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे आम्हांला शिकवायला होते. ते विभागप्रमुख होते. त्यांच्या नावाचा दबदबा आधी होताच. ते आधी नू.म.वि. मध्ये शिकवत होते. भारताचे सरन्यायाधीश य. वि. चंद्रचूड, कवी वसंत

बापट, लेखक विद्याधर पुंडलिक, अरविंद गोखले असे त्यांचे नामवंत विद्यार्थी! मुंबई विद्यापीठाचे मराठीतील पहिले पीएच.डी. असलेले डॉ. सहस्रबुद्धे होते. अत्यंत धीरगंभीर, व्यासंगी आणि निष्ठावान शिक्षक म्हणून त्यांची ख्याती होती. अत्यंत साधी राहणी. प्रभात टॉकीज पलीकडे एका चाळीवजा इमारतीत ते राहत होते. त्यांची व्याख्याने ऐकण्यासाठी मा. शिवाजीराव भोसले यांच्यासारख्या काही व्यक्तीही तेव्हा स. प. महाविद्यालयात येत असत. लोकसत्तेला दंडसत्तेचे आव्हान, पराधीन सरस्वती, आधुनिक महाराष्ट्र असे त्यांचे वैचारिक ग्रंथ गाजले होते. निबंध वाङ्मय हा त्यांचा अत्यंत आवडता वाङ्मय प्रकार! निबंधात लेखनाची एक शिस्त असते. विषयविधान, प्रतिपादन, खंडनमंडन, त्यासाठी साधार विवेचन, परिच्छेदासह मुद्देसूद मांडणी, शेवटी निष्कर्ष व उपसंहार अशी त्यांची मांडणी होती. आपल्या जीवनातही निबंधासारखी शिस्त असली पाहिजे असे त्यांचे मत होते. आमच्या मराठी वाङ्मय मंडळाचे कार्यक्रम आखतानाही त्यांच्यापुढे निश्चित कार्यक्रम घेऊन जाऊन मगच त्यांची संमती मिळवावी लागे. प्रत्येक कार्यक्रम बांधेसूद असला पाहिजे हा त्यांचा आग्रह!

त्यांच्या एका नामवंत विद्यार्थ्याचे लग्न ठरले. तो निमंत्रण देण्यास सरांकडे गेला. सरांनी सर्व माहिती विचारून त्याला 'लग्नाचा निबंध कर' असे सांगितले. निमंत्रण पत्रिका कशी, संख्या किती, निमंत्रित किती, भोजनाचा तपशीलवार बेत, भटजी दक्षिणा किती, हुंडा न घेणे, कार्यालय कोणते, सर्व विधीला एकंदर किती वेळ लागेल याची आखणी कर, असे त्याला सांगितले.

डॉ. सहस्रबुद्धे सरांनी आम्हांला साहित्यदृष्टी तर दिलीच; पण ती देता देता जीवनदृष्टीही दिली. साहित्यातील चांगल्या-वाईटाच्या निवडीबरोबरच, जीवनातील चांगले-वाईट जाणून त्याप्रमाणे आपली वर्तणूक व्यक्ती, समाज व राष्ट्र यांच्या विकासाला पूरक ठरेल असे आपले जीवन असावे, असे त्यांनी आमच्या मनावर ठसविले. त्या काळात नुकतेच नवकाव्य उदयास येत होते. मुक्तछंदात्मक रचना कवी करत. डॉ. सहस्रबुद्धे यांना मात्र ते काव्य ढिसाळ वाटे. त्यावर ते सपाटून टीका करीत, पण त्यांची टीका साधार असे.

एखाद्या वाङ्मयप्रकाराच्या अभ्यासासाठी नेमके कोणते समीक्षा ग्रंथ वाचले पाहिजेत, याची यादीच ते आम्हांला देत, त्यानंतर प्रत्येकाचा एकेक ग्रंथ पूर्ण वाचून झाला, की मग ते सर्वांना एकत्र बोलावत. प्रत्येकाने आपण वाचलेल्या ग्रंथाचे थोडक्यात परिशीलनात्मक निवेदन करावे, असे ते सांगत. अशा उपक्रमांमुळे त्या बॅचच्या सर्वांनाच अशा सर्व ग्रंथांचा सखोल परिचय व्हायचा.

वर्गात आणि महाविद्यालयात ते गंभीर आणि शिस्तबद्ध होते, पण आमच्या वाङ्मय मंडळाच्या सहलीत त्यांचे वागणे, बोलणे मोकळे आणि अघळपघळ असायचे. पुणे विद्यापीठात आमच्या वाङ्मय मंडळाची सहल होती. प्रा. सरोजिनी वैद्य, डॉ. व. दि. कुळकर्णी हे आमचे अन्य नामवंत प्राध्यापकही बरोबर होतेच. जाताना खळाळणाऱ्या हास्यविनोदात पु. ग. सरही सामील होत, एवढेच नव्हे तर एकदा भेंड्यांच्या खेळात त्यांच्यावर गाणे म्हणण्याची वेळ आली असताना, त्यांनी त्या अक्षरारंभाची एक लावणीही म्हणून दाखवली होती. विद्यार्थ्यांनी टाळ्यांचा कडकडाट केला, तेव्हा सरही खळखळून हसले. त्यांचे हे अगदी वेगळे रूप सहलीच्या वेळी विद्यार्थ्यांना बघायला मिळाले.

एक प्राध्यापक म्हणून, समीक्षक म्हणून, विद्वान म्हणून, व्यासंगी म्हणून पु. ग. सर जेवढे मोठे होते,

तेवढेच ते माणूस म्हणूनही फार मोठे होते. त्यांच्या अंतःकरणातील माणुसकीचा झरा वेळप्रसंगी खळाळून वाहत असे. याचा मीच एकदा विलक्षण अनुभव घेतला आहे.

मी बी. ए. पास झालो, बी. एड. झालो, शिक्षक म्हणून काम करू लागलो, तरी पु. ग. सरांकडे माझे येणे–जाणे होतेच. त्यांना स्वतःला अपत्य नव्हते; पण आमच्या सारख्यांवर ते अपत्यवत प्रेम करीत. नेहमीच प्रकृतीची विचारपूस करीत.

त्या काळात माझी प्रकृती चांगली नव्हती. माझी हर्नियाची शस्त्रक्रिया ताराचंद हॉस्पिटलमध्ये झाली होती. गरिबीमुळे मी तिथे गेलो होतो; पण दोनच वर्षांत पुन्हा त्रास होऊ लागला. आता पुन्हा शस्त्रक्रिया करावी लागणार म्हणून माझ्या अंगावर काटाच आला. ताराचंदसारख्या धर्मार्थ रुग्णालयापेक्षा एखाद्या नामवंत खाजगी शस्त्रवैद्याकडे शस्त्रक्रिया करावी, असे मला वाटले. डॉ. पी. बी. सुलाखे (हुजुरपागा इमारत) हे नामवंत शस्त्रवैद्य होते, पण त्यांची फी मला परवडणारी नव्हती. मी खट्टू झालो होतो.

याच काळात पु. ग. सरांचा षष्ट्यब्दीपूर्ती सोहळा स. प. महाविद्यालयाच्या देवी रमाबाई सभागृहात साजरा झाला. या समारंभात डॉ. सुलाखे यांनी पु. ग. सरांचे विद्यार्थी म्हणून भाषण केले. खूप छान भाषण झाले. तो धागा पकडून मी एके दिवशी पु. ग. सरांकडे गेलो. त्यांना माझी समस्या सांगितली. ती ऐकून घेताच सर म्हणाले, ''गाढवा हे आधी का नाही बोललास? इतके दिवस कशाला लावलेस?'' असे म्हणून सर स्वतः मला डॉ. सुलाखे यांच्याकडे घेऊन गेले. डॉ. सुलाखे यांनी पु. ग. सरांना नमस्कार केला. सरांनी माझ्या शस्त्रक्रियेविषयी सांगितले. माझी परिस्थिती सांगितली, डॉ. सुलाखे म्हणाले, ''सर, हा तुमचा विद्यार्थी म्हणजे माझा गुरुबंधू. मी ऑपरेशन करतो आणि मोबदल्याची कोणतीही अट नाही.''

डॉ. सुलाखे यांच्या खाजगी दवाखान्यात माझ्यावर उत्तम शस्त्रक्रिया झाली. महत्त्वाची गोष्ट म्हणजे मला ऑपरेशन थिएटरमध्ये नेताना स्वतः डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे आणि त्यांच्या पत्नी द्वारकुताई दोघेही हजर होते. माझी शस्त्रक्रिया झाल्यावर मला खोलीत आणल्यावर मी शुद्धीवर येईपर्यंत सर आणि बाई दोघेही माझ्याजवळ बसून होते. मी शुद्धीवर आल्यावर माझ्या डोक्यावर मायेने थोपटून सरांनी डॉ. सुलाखे यांचे आभार मानले आणि मगच त्यांचा निरोप घेतला.

डॉ. सुलाखे यांना मोबदला म्हणून आम्हांला परवडणारी रक्कम आम्ही पाकिटात घालून दिली. त्या काळी डॉ. सुलाखे यांना हजारो रुपये मोबदला मिळत असे; पण त्यांनी आमचे पाकीट उघडूनही पाहिले नाही. उलट ते म्हणाले, ''हा गुरुप्रसाद आहे असे मी समजतो.'' असे होते आमचे गुरू, माणुसकीचा गहिवर असलेले, थोर समीक्षक, नामवंत प्राध्यापक पु. ग. सहस्रबुद्धे सर!

वाचकहो!

प्राथमिक, माध्यमिक व उच्चशिक्षण या काळांतील या तीन थोर गुरूंची ओळख मी तुम्हांला या लेखाद्वारे करून दिली आहे; पण असे आणखी किती तरी शिक्षक आमच्या पिढीत होते, की ज्यांच्यावर लिहावे. अशा सर्व गुरूंबद्दल मी एवढेच म्हणतो,

''तस्मै श्री गुरवे नमः!''

# चैतन्याचे झरे

**शशिकांत शिंदे**
आरण्यक, पाटीलबानगर, मु. पो. कोल्हार,
ता. राहाता, जि. अहमदनगर
भ्रमणध्वनी : ९८६०९०९१७९

*शालेय वयात, संस्कारक्षम वयात झालेले वाचनाचे, कलेचे संस्कार यांच्या आठवणींना उजाळा देतानाच, शिक्षक असणाऱ्या वडिलांचे व्यक्तिमत्त्व, त्यांच्या आठवणी आणि अन्य शिक्षकांच्या आठवणी त्यांच्या वैशिष्ट्यांसह जागवल्या आहेत. प्राथमिक, माध्यमिक, महविद्यालयीन अशा सर्वच स्तरांवर भेटलेल्या शिक्षकांविषयी सुंदर शब्दांत कृतज्ञता व्यक्त केली आहे. यातून लेखकाच्या जडणघडणीतील शाळेचे महत्त्व अधोरेखित होते. अत्यंत लालित्यपूर्ण सुंदर लेख.*

माझी शाळा घरापासून जवळ होती. घंटेचा आवाज घरापर्यंत ऐकू येई. आवाज ऐकला, की आम्ही शाळेकडे पळत असू. पाठीवरील दप्तराची पिशवी सांभाळता सांभाळता तारांबळ उडत असे. विद्यार्थ्यांच्या किलबिलाटाने शाळेचा परिसर दणाणून जाई. शाळेची बैठी दगडी इमारत. वर उतरत्या पत्र्यांचे छत. समोर विस्तीर्ण आवार. लिंब, चिंचेची डेरेदार झाडे. त्यांची घनदाट सावली. अचानक शिट्टी वाजवण्याचा आवाज येई. पायजमा, सदरा आणि गांधी टोपी घातलेले साळी गुरुजी समोर उभे असत. मुलामुलींच्या आपोआप वर्गनिहाय रांगा होत. कविवर्य ग. ह. पाटील यांच्या 'देवा तुझे किती सुंदर आकाश' या कवितावजा प्रार्थनेने परिपाठाला सुरुवात होई. सुविचार, दिनविशेष, वृत्तपत्रातील महत्त्वाच्या बातम्यांचे वाचन, प्रतिज्ञा आणि राष्ट्रगीत असा भरगच्च कार्यक्रम असे. पुन्हा शिट्टी वाजवत साळी गुरुजी समोर येत. आता कवायत सुरू होई. बँड पथक सज्ज असे. गुरुजी एकेक प्रकार करून दाखवीत. त्यांच्या सूचनेनुसार मुलेमुली एकेक प्रकार करण्यात दंग होऊन जात. कवायतीच्या सुलभ हालचालींतून एकाच वेळी शेकडो फुले उमलल्याचा भास होत असे. साळी गुरुजी एखाद्या अनभिषिक्त सम्राटासारखे भासत. त्यांच्या इशाऱ्यावर सगळे मैदान हलत असे. गुरुजींचे चापल्य वाखाणण्यासारखे होते. कवायत संपली, की गुरुजी 'बैठेंगे बैठ जाओ' ची ऑर्डर सोडत. मुले-मुली आपसूक खाली बसून दमसास घेत. आता गुरुजींचा विरंगुळ्याचा मनोरंजक कार्यक्रम सुरू होत असे. गुरुजी साभिनय एक कृती करून दाखवीत. त्यावेळी त्यांच्या हातांच्या हालचाली बघण्यासारख्या असत. कमरेवर हात ठेवून ते प्रसंगी नाचतही. त्याला मजेदार शब्दांची जोड असे. 'अरे मदारी आया, डिग्गा डिग्गा डिग्गा, अरे कौन कौन आया? डिग्गा डिग्गा डिग्गा. ड्रायव्हर आया, पॉम पॉम पॉम' आणि बरेच काही. मुले-मुली तल्लीन होऊन ऐकत आणि पाहात असत. मधूनच हास्याचे फवारे उडायचे. माचिस शिलगावून, फटाक्याची वात पेटवण्याचा आणि तो फुटल्यानंतर कानठळ्या बसवणाऱ्या आवाजाचा मूकाभिनय गुरुजी एखाद्या कसलेल्या अभिनेत्याप्रमाणे करीत. त्यामुळे परिपाठाची रंगत अधिकच वाढत जाई. मराठी शाळेतला परिपाठाचा तास त्यामुळे कधीच कंटाळवाणा वाटला नाही. तो आनंददायी, आरोग्यपूर्ण, ज्ञान आणि मनोरंजनाचा शैक्षणिक कार्यक्रम होता. आता मैदानेच राहिलेली नाहीत; असतील, तर ती ओसाड पडलेली आहेत. जीवन शिक्षण

नावाची गोष्ट अशी अडगळीत पडून राहिल्याने आत्मिक विकासाला आपोआपच खीळ बसली आहे.

इयत्ता पहिली, दुसरीचा वर्ग मी माझ्या वडिलांच्या हाताखालीच शिकलो. ते शिक्षकच होते. कडक शिस्तीचे, रागीट. मुलांनी अभ्यास करावा, व्यवस्थित वागावे यासाठी त्यांचा अट्टहास असे. प्रसंगी ते शिक्षाही करीत. माझे वडीलच माझे गुरुजी असल्यामुळे, त्यावेळी मी थोडा शेफारल्यासारखा वागत असे. मुलांच्या खोड्या काढ, त्यांना गुद्दे मार, त्यांच्या पाट्या फोड असे उद्योग करीत असे. गुरुजीच माझे वडील असल्यामुळे मुले तक्रार करायला घाबरत, परंतु वडिलांच्या ते लक्षात येत असे. मग संधी मिळताच ते माझीही पिटाई करीत, समज देत. त्यावेळी शाळेत बाल, किशोर, कुमारवयीन मुलांसाठीची काही मासिके येत. त्यात छान छान गोष्टी, कविता, चुटकुले असत. त्या वयाला साजेशी आणखी काही पुस्तकेही शाळेत होती. एके दिवशी वडिलांनी आम्हा मुलांना अलिबाबाची गुहा दाखवावी, तसे ते पुस्तकांचे कपाट उघडून दाखवले. जादूचा खजिना सापडल्याचा आनंद झाला. ती पुस्तके हातात घेऊन चाळताना, त्यातील चित्रे बघताना आमच्या अबोध मनावर अक्षरांचा झालेला संस्कार एखाद्या चित्रलिपीसारखा गडद होत गेला. वेळ मिळेल तसा आम्ही तो अनुभव घेत राहिलो. ती पुस्तके, ती मासिके अजूनही मनात घर करून आहेत. कदाचित त्यांनीच पुढचा सर्जनाचा प्रवाह खुला केला. माझ्या सर्जनशीलतेला अक्षरांचा संदर्भ देऊन शब्दांचा न मिटणारा वसा दिला. वडिलांचा आवाज खूप मोठा होता. वर्गाला शिकवताना अख्ख्या शाळेला ऐकू जाईल अशा आवाजात ते शिकवायचे. त्यामुळे मुलांचे लक्ष पांगत नसे. तो विषय त्यांचा पक्का होत असे. शाळेत रागीट, कडक शिस्तीचे असणारे माझे वडील घरी खूपच मवाळ होते. ते प्रेमळ होते, हळवे होते, काटकसरी होते. फाजील लाड करायला त्यांच्याजवळ पुरेशी पुंजीही नव्हती. त्यामुळे आम्हीही फार हट्ट केल्याचे आठवत नाही. शाळेत शिक्षक आणि घरी वडील असा दुहेरी नात्यांचा गोफ त्यांनी माझ्यासाठी नेटका विणलेला होता. अभ्यास एके अभ्यास असा कित्ता त्यांनी कधीच गिरवला नाही. खेळाचा, इतर छंदांचा त्यांनी नेहमीच पुरस्कार केला. अभ्यास झाल्यावर फावल्या वेळात खेळणे आणि अवांतर वाचन हे छंद मला जडले. गावातील वाचनालयात वडिलांसोबत मीही जात असे. वडील वर्तमानपत्रातील ओळन्‌ओळ बारकाईने पुटपुटल्यासारखी वाचून काढीत. पुढे मलाही वृत्तपत्र वाचनाची गोडी निर्माण झाली. आई फारशी शिकलेली नव्हती, परंतु तीही या सगळ्या गोष्टींकडे कौतुकाच्या नजरेने पाहत असे. शिक्षक म्हणून वडिलांनी माझ्या अंतःकरणात पेटवलेला वाचनाचा दिवा अजूनही अखंडपणे तेवतोच आहे. माझ्या वाचनवेडाचे संपूर्ण श्रेय त्यांचेच. वाचनाने माणूस सजग होतो, शहाणा होतो, नीतिमान होतो, विवेकी होतो आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे तो माणूस होतो, याची जाणीव त्यांना असावी; म्हणून त्यांनी शाळेतील उघडून दिलेले पुस्तकांचे कपाट हे माझ्यासाठी अलिबाबाच्या गुहेइतकेच अपूर्वाईचे होते. याचे प्रत्यंतर आयुष्याच्या विविध टप्प्यांवर येत गेले. पुस्तके व मासिके यांनी ओसंडून वाहणारे कपाट आज माझ्या अभ्यासिकेत असले, तरी ते शाळेतील पुस्तकांचे कपाट मला बोलावत राहते. मी पुन्हा मूल होऊन त्या गतकाळात जातो. समोर पुस्तकांचे कपाट असते, परंतु ते उघडून देणारे हात केव्हाच अंतर्धान पावलेले असतात.

इयत्ता चौथीला आम्हांला गायकवाडबाई होत्या. चौथीचा वर्ग मुख्य इमारतीच्या पाठीमागे मारुती मंदिराशेजारी असणाऱ्या दोन खोल्यांच्या कौलारू इमारतीत भरत असे. गायकवाडबाईसुद्धा कडक शिस्तीच्या होत्या. गणिताच्या तासाला हातात छडी घेऊन मुला-मुलींच्या रांगेमधून फेऱ्या मारणाऱ्या बाई मला साक्षात आर्यभट्टाच्या कुळातील वाटायच्या. कोणतेही अवघड

गणित त्या चुटकीसरशी सोडवायच्या. पाटीवर उदाहरणे सोडवता सोडवता आम्हांला आमची कुळे आठवायची. आईच्या आपुलकीच्या मायेने त्या समजावून सांगायच्या. छडीचा वापर सर्रासपणे होत नसे, परंतु त्यांच्या एकूणच व्यक्तिमत्त्वाचा धाक होता. बाईंच्या टेबलावर तांब्या–फुलपात्र नेहमी भरलेले असे. ते रिकामे झाले, की भरून आणण्यासाठी मुलामुलींची चढाओढ लागे. थोड्याशा अंतरावर असणाऱ्या त्यांच्या घरी जाऊन मुली तांब्याभांडे भरून घेऊन येत. बाई खूप नीटनेटक्या राहत. मळखाऊ रंगांच्या; परंतु स्वच्छ साड्या त्यांच्या अंगावर असत. त्या बऱ्याचदा उदास दिसत. खुर्चीवर बसून भरून आलेले डोळे पुसताना, आम्ही त्यांना भाबडेपणाने पाहत असू. दुःखाची छटा त्यांच्या चेहऱ्यावर आपसूक दिसे. कवयित्री शांताबाई शेळके यांची 'लाडकी बाहुली' ही कविता शिकवताना त्यांचा कंठ दाटून येत असे. हुंदका दाबून त्या एकेक शब्द उच्चारत.

*'लाडकी बाहुली होती माझी एक*
*मिळणार तशी ना शोधुनी दुसऱ्या लाख'*

ही कविता शिकवताना त्या आमच्यात असूनही नसल्यासारख्याच भासत. दूर काहीतरी हरवले आहे आणि त्याचा शोध घेणारी त्यांची नजर धारदार होऊन आमच्या काळजावर फिरत असे. रिकामा झालेला तांब्या आणि फुलपात्र घेऊन त्यांच्या घरी जावे आणि त्यांच्या दुःखाचे कारण शोधावे, असे मला कित्येक वेळा वाटे परंतु ते धाडस कधीच झाले नाही. त्या वेळी चौथीला शिष्यवृत्तीची स्पर्धा परीक्षा असे. त्यासाठी बाई जादा तास घेत. माझी अभ्यासातील प्रगती यथातथाच होती, परंतु गुरुजींचा मुलगा म्हणून माझी परीक्षेसाठी वर्णी लागली होती. मी झटून अभ्यास केला. निकाल लागला, तेव्हा कोणत्याच यादीत माझे नाव नव्हते. वडिलांना याचे खूप दुःख झाले; परंतु उघडपणे त्यांनी ते कधी बोलून दाखवले नाही. जयश्री कहार या हुशार मुलीला त्यावर्षी शिष्यवृत्ती मिळाली. तिने दिलेले पेढे आम्ही निमूटपणे खाली मान घालून खाल्ले. आपली पासातही गणना झाली नाही, याचे शल्य मला पुढे कितीतरी दिवस अस्वस्थ करीत होते. त्या वेळी बाईंनी मला जवळ बोलावून माझी समजूत घातलेली मला आठवते. त्यांचे शब्द आठवत नाहीत, परंतु त्यांच्या हातांचा उबदार स्पर्श मला नेणिवेतही जाणवत राहतो. चौथीची परीक्षा चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झालो. माझा सहाध्यायी रफिक इनामदार; जो केवळ उत्तीर्ण झाला होता, त्याला आनंदाचे भरते आले. त्याने चक्क मला उचलून घेतले आणि नाचत सुटला. बाईंचे दर्शन घेऊन आम्ही बाहेर पडलो. त्यानंतर पुन्हा कधीच बाईंची भेट झाली नाही. गावाकडे गेलो, की त्यांची हटकून आठवण येते. वर्तमानाचा गाळ खाली बसून, भूतकाळ अलगदपणे तरंगत वर येतो. बाईंची छडी घेऊन वावरणारी मूर्ती नजरेसमोर दिसू लागते. त्यांनी घातलेली उदाहरणे आठवतात. त्यांनी शिकवलेली 'लाडकी बाहुली' ही कविता आठवते आणि कुठल्याशा अनामिक हुरहुरीने डोळे भरून येतात. गावातून फेरफटका मारताना पाय आपसूक शाळेकडे वळतात, तर दोन खोल्यांची ती कौलारू इमारत नाहीशी झालेली असते. कुठल्याच खुणा सापडत नाहीत. मी तिथेच वेंधळ्यासारखा उभा राहतो. बाई येतील आणि माझी समजूत घालतील, ही भाबडी आशा मनात जागी असते.

हायस्कूलला आल्यावर गुरुजी, बाई या संज्ञा गळून पडल्या. सर, मॅडम या उपाध्या तोंडात रुळायला अंमळ उशीर लागला. गुरुजी, बाई या शब्दांत जो आपुलकीचा धागा होता, तो सर, मॅडम या शब्दांनी कमकुवत केला. आता मराठी शाळेसारखे दिवसभर एकच एक गुरुजी समोर नसतात. प्रत्येक तासाला वेगवेगळे सर आणि मॅडम. हिंदी विषयाला राजपूत म्हणून सर होते, ते मारकुटे सर म्हणून प्रसिद्ध होते. त्यांच्या तासाला मुले खाली मान घालूनच

बसायची. एके दिवशी अचानक त्यांनी आमच्या वर्गासाठी निबंध स्पर्धा आयोजित केली. विषय होता 'सुखें पेड की आत्मकथा'. निबंध घरूनच लिहून आणायचा होता. मी माझ्या कल्पनेप्रमाणे निबंध लिहिला. एक वाळलेले झाड पांथस्थाला आपल्या हिरव्या भूतकाळाबद्दल काही सांगू पाहतेय, अशा आशयाची मी त्याची मांडणी केली. त्याची समृद्धी, त्याची सावली, त्याच्या झाडोऱ्यातील पक्ष्यांची घरटी, त्याची फुले-फळे आणि मानवाच्या हस्तक्षेपामुळे त्याचे वठणे. सगळ्यांचे निबंध तपासून सरांनी ते बाड एके दिवशी वर्गात आणले. सगळ्यांच्या मनात धाकधूक होती. मी मान खाली घालूनच बसलो होतो. सरांनी अगोदर स्पर्धेविषयीच्या अपेक्षा व्यक्त केल्या. काही निबंधांचा मागोवा घेतला आणि अचानक माझे नाव घेऊन मला उभे राहायला सांगितले. माझी पाचावर धारण बसली. आपली काहीतरी भयंकर चूक झाली, असे वाटून मी अधिकच आक्रसून गेलो. सरांनी त्यांच्या हाताने माझा झुकलेला चेहरा वर केला आणि मुलांना टाळ्या वाजवायला सांगितले. त्यांना माझा निबंध सर्वांत उत्तम वाटला होता. विषयाला न्याय देणारा आणि कल्पनाशक्तीचा पुरेपूर वापर असणारा निबंध म्हणून सरांनी त्याचा गौरव केला. सरांच्या हस्ते मला बक्षीसही मिळाले. मी आनंदून गेलो.

शाळेला हेडमास्तर म्हणून बारगळ सर होते. उंचेपुरे, केस मागे वळवलेले, करडी नजर, शर्ट इन केलेला. ते मैदानावर उभे असले, की मुले शिस्तीत वागत. शिपाई सावलीसारखा त्यांच्या सोबतच असे. वर्गावरून ते डोकावून जात. त्यांच्या नजरेतून काहीच सुटत नसे. शिक्षकांच्या चुका त्यांच्या तोंडावर सांगण्याचे धाडस त्यांच्याकडे होते. उनाड मुलांना 'टग्या' म्हणण्याची त्यांची खास स्टाईल होती. मुलांचे अस्ताव्यस्त वाढलेले केस ते कापायला लावीत. त्याचा निषेध म्हणून नववीच्या वर्गाने सामूहिक चमनगोटा केल्याचे आठवते. तेव्हा वर्गावर येऊन 'माझा दहावा घातला काय?' असा सवाल करून मुलांच्या निषेधाची हवाच त्यांनी काढून टाकली होती. शाळेत मुलांमध्ये अपप्रवृत्तींचा शिरकाव होऊ नये म्हणून ते नेहमीच जागरूक असत. स्नेहसंमेलनासाठी वक्त्यांना ते प्रमुख पाहुणे म्हणून पाचारण करीत. सरांच्या सुविद्य पत्नीही शिक्षिका होत्या. आज दोघेही निवृत्त होऊन गावाकडे छानसे आयुष्य जगत आहेत. त्यांचे शेतातील घर आणि आंब्याच्या रसरसलेल्या बागेने त्यांचे आयुष्य अधिकच समृद्ध केले आहे. आंब्याच्या एखाद्या झाडाला त्यावर्षी फळच आले नाही, तर सर कदाचित त्यालाही 'टग्या' म्हणून फळांविषयी विचारणा करत असतील अशी पुसटशी शंका माझ्या कल्पनेला नेहमीच ढुशा देत राहते.

अकरावीला कॉलेजमध्ये प्रवेश घेतला, तेव्हा पहिल्याच दिवशी रसायनशास्त्र (केमिस्ट्री) विषय शिकवणाऱ्या मुजावर सरांनी वहीच्या पहिल्या पानावर सुप्रसिद्ध साहित्यिक वि. स. खांडेकर यांच्या 'अमृतवेल' या कादंबरीतील एक उतारा लिहून घ्यायला सांगितला. आयुष्याचे तत्त्वज्ञान त्यात होते. सर रसायनशास्त्र सुंदर शिकवायचे आणि जोडीला अशा उन्नत करणाऱ्या गोष्टींचे रसायन. त्यामुळे आयुष्याच्या वाटा यशाच्या, सफलतेच्या आणि नैतिकतेच्या राजमार्गालाच जाऊन मिळाल्या.

शाळेत शिकवणाऱ्या शिक्षकांच्या सोबतच शाळेबाहेरच्या अफाट जगातील शिक्षक नसणाऱ्या शिक्षकांनी माझ्या झोळीत भरभरून ओतले. त्यांनी कळत नकळतपणे रुजवलेल्या संस्कारांनी आयुष्याचे कोठार शिगोशिग भरून गेले. ते ओतत राहिले, मी भरून घेत राहिलो आणि समृद्ध होत गेलो. ते भेटले नसते, तर आयुष्य कदाचित वेगळ्या वळणावर गेले असते! साळी गुरुजींनी कलेकडे, कलावंतांकडे पाहण्याची निर्व्याज, निर्मळ दृष्टी बहाल केली. कला हे जीवनरूपी झाडाचे हरितद्रव्य असते, याचा त्यांनी शाळेच्या छोट्याशा मैदानावर परिपाठाच्या निमित्ताने हसतखेळत परिचय

करून दिला. माझ्या वडिलांनी पुस्तकांचे कपाट उघडून वाचनाचा किडा मेंदूत अलगद सोडून दिला. वाचनाचा व्यासंग जडला. पुस्तकांनी माझ्या घराचा एक कोपरा शोभिवंत केला आहे. गायकवाड बाईंनी हळवेपणाच्या बिया काळजात पेरून दिल्या. त्याची कितीतरी झाडे उगवून आली. त्यामुळे सहृदयतेचा, औदार्याचा आणि समर्पणाचा नितळ दृष्टिकोन विकसित झाला. राजपूत सरांच्या त्या निबंधाने तर जादूच केली. माझ्यातील लेखकाला त्यांनी हलकेच जागे केले. माझ्या लेखकीय शक्यतांची मुळे त्या निबंधाच्या कसदार मातीतूनच तरारलेली आहेत. बारगळ सरांनी करड्या शिस्तीतून सन्मार्गाचा, सद्विचारांचा उजेड दाखवला. मुजावर सरांनी रासायनिक क्रियाच केली. विज्ञानाच्या घनदाट अरण्यात साहित्याची नागमोडी पाऊलवाट रेखाटून दिली. ते सर्व जण आता कोठे असतील? कदाचित पुन्हा भेट होण्याची शक्यता नाही. मात्र त्यांची शिकवण, त्यांची दृष्टी, त्यांचे विचार, त्यांचा स्पर्श माझ्या अणुरेणूत चैतन्याचा झरा बनून अविरतपणे वाहतो आहे.

◈◈◈

---

**(पृष्ठ क्र. १४ वरून)**

पी. जी. सर म्हणजे इंग्लिश भाषा आणि साहित्याचा महाकोशच! संदर्भांची विविधता आणि विपुलता हे त्यांच्या व्यासंगाचे वेगळे वैशिष्ट्य होते. हवे ते संदर्भ ओठावर असायचे आणि हवे तेव्हा हव्या त्या ठिकाणी ओठातून प्रकट व्हायचे. कोणत्याही विषयावर सर्व बाजूंनी विवेचन करताना, तो विषय वर्तमान जीवनाच्या विविध पैलूंशी जोडण्याची त्यांची हातोटी विलक्षण प्रभावी होती. त्यांच्या प्रत्येक लेक्चरमधून विद्यार्थ्यांमध्ये मोठी ज्ञानलालसा निर्माण होत असे. सरांच्या विवेचनातून इंग्लिश भाषेमधील सौंदर्याचा, साहित्यातील आशयाचा आस्वाद घेताना आपल्याला खूप काही वाचायला हवे, हा विचार विद्यार्थ्यांमध्ये रुजायचा. विद्यार्थ्यांच्या विचार प्रक्रियेला चालना मिळायची.

व्यासंग अफाट होता, म्हणून सरांचे वर्गातील लेक्चर अथवा व्यासपीठावरील व्याख्यान कधीही विद्वज्जड, गंभीर किंवा कंटाळवाणे असे व्हायचे नाही. विद्यार्थ्यांच्या पातळीवर जाऊन शिकवण्याचे कौशल्य, हलकीफुलकी नर्मविनोदी शैली आणि विवेचनाला अर्थपूर्णता देणाऱ्या देहबोलीची जोड मिळत असल्यामुळे त्यांच्या शब्दांनाही चैतन्याचा वेगळा स्पर्श लाभायचा. वाणीला चारित्र्यसंपन्न व्यक्तिमत्त्वाचे पाठबळ असल्यामुळे त्यांचे शब्द विद्यार्थ्यांच्या अंतःकरणाला भिडत असत.

अध्ययनशीलता हा सरांचा ध्यास होता आणि अध्यापन हा त्यांचा श्वास होता. प्राचार्य असतानासुद्धा ते प्राध्यापकांच्या बरोबरीने तास घ्यायचे. शेवटचा तास हा त्यांच्या खास आवडीचा. मग वेळेचे बंधन उरायचे नाही.

नंतर माझी बदली 'आर्ट्स, सायन्स, कॉमर्स कॉलेज पनवेल' येथे झाली. पी. जी. सर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे सदस्य होते. मुंबईत यशोधन बिल्डिंगमध्ये ते राहायचे. मधूनमधून पनवेलहून मुंबईला जाऊन सरांना भेटायचो, गप्पा व्हायच्या. त्यांचे सहज बोलणे म्हणजे अथांग ज्ञान आणि प्रदीर्घ अनुभवाच्या आधारे लाभलेले मार्गदर्शन असायचे.

१९७४ ते १९९४ एवढ्या दोन दशकांत प्रारंभी विद्यार्थी म्हणून, नंतर लेक्चरर म्हणून आणि पुढे अधिकारी झाल्यावरही सरांना अनेकदा पाहिले, अनुभवले, त्यांची व्याख्याने, उद्बोधक सत्रे ऐकली. त्यांच्याशी बोललो. त्यांचे लेखन वाचले. त्यामुळे मनातील सरांची आदर्श प्रतिमा उत्तरोत्तर अधिकाधिक विशाल होत गेली. माझ्या जीवनात माझ्या आई बरोबरच मोठे स्थान आहे ते बॅरिस्टर पी. जी. पाटील सर आणि प्राचार्या सुमतीबाई पाटील मॅडम यांचे!

◈◈◈

# शिक्षक हेच दुसरे पालक

**अरुण सांगोलकर**
वरिष्ठ अधिव्याख्याता तथा विभाग प्रमुख,
(प्रसारमाध्यम, इंग्रजी, उर्दू विभाग),
राज्य शै. सं. व प्र. प. महाराष्ट्र, पुणे.

आई-वडील आपल्याला लहानपणापासून चांगल्या सवयी शिकविण्याबरोबरच आपल्यावर चांगले संस्कार करतात, तर शिक्षक हे विद्यार्थ्यांना सामाजिक, आर्थिक आणि व्यावहारिक ज्ञान देऊन त्याचा सर्वांगीण विकास करतात. आई-वडिलांनंतर शिक्षकांकडून किंवा आपल्या गुरुजनांकडून नवनवीन गोष्टी आयुष्यामध्ये शिकायला मिळतात; म्हणूनच शिक्षक हे आपल्या आयुष्यातील दुसरे पालक असतात. आपले व्यक्तिमत्त्व, विचार, मते आणि करियर घडवण्यामागे शिक्षकांचा मोठा वाटा असतो. याचबरोबर चांगले संस्कार, जीवन जगण्यासाठी आवश्यक असणारी शिस्त देऊन जगासमोर उभे राहताना विविध आव्हाने पेलण्याची ताकद शिक्षकांमुळे आपणास मिळते; म्हणून विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यामधील नाते व त्यामधील जिव्हाळा समजून घेण्यासाठी शिक्षक दिन साजरा केला जातो.

गुरू-शिष्याचे संबंध हे मनुष्य जीवनास एका वेगळ्या उंचीवर घेऊन जाणारे ठरतात. एकाच बागेत ज्याप्रमाणे विभिन्न रंग, रूप असणारी फुले सजवणाऱ्या माळ्याप्रमाणे शिक्षकाची भूमिका असते, आपल्या विद्यार्थ्यांना प्रसंगी काट्यांवरसुद्धा हसतहसत चालण्यासाठी गुरुजन नेहमी प्रेरित करत असतात; म्हणून आजच्या दिवशीच नव्हे, तर प्रसंगी आयुष्यभर शिक्षक हे सन्मानाचे हक्कदार असतात कारण शिक्षकच आपले चांगले चरित्र घडवू शकतात; म्हणूनच त्यांना भावीपिढीचे शिल्पकार असे देखील म्हटले जाते.

*"शिक्षक दिन का साजरा केला जातो, त्याची पार्श्वभूमी, स्वरूप विशद करताना शिक्षक पालकत्वाची भूमिका कशी निभावतात याचे सुंदर विवेचन या लेखामध्ये केले आहे."*

एखादा मूर्तिकार ज्याप्रमाणे दगडाचा नको असलेला भाग काढून त्यावर संस्कार करून सुबक अशी मूर्ती घडवतो, त्याप्रमाणे शिक्षकदेखील विद्यार्थ्यांवर संस्कार करून त्यांचे व्यक्तिमत्त्व घडवत असतात.

भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जन्मदिवसाच्या निमित्ताने शिक्षकांप्रति असणारा आदरभाव व सन्मान प्रकट करण्यासाठी हा दिवस ५ सप्टेंबर या दिवशी साजरा केला जातो.

गुरूंचे प्रत्येकाच्या जीवनात, समाजात एक विशिष्ट स्थान असते, अनन्यसाधारण महत्त्व असते. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा शिक्षणावर दृढविश्वास व प्रेम होते आणि ते एक महान शिक्षक होते. या दिवशी संपूर्ण देशात भारत सरकारद्वारे उच्चतम कामगिरी करणाऱ्या शिक्षकांना पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते.

या दिवशी अनेक शाळा, महाविद्यालये विविध कार्यक्रमांचे आयोजन करतात जसे की, मोठ्या गटातील मुलांनी लहान मुलांना शिकवणे, आपले मनोगत व्यक्त करणे, अनेक ठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित

**(पृष्ठ क्र. ३८ वर)**

# टाकीचे घाव

**डॉ. संजय मालपाणी**
संगमनेर
भ्रमणध्वनी : ९८५०८११२७१

*वाचनाची, भाषेची आवड जोपासण्यासाठी प्रवृत्त करणाऱ्या, वाचनाबरोबरच श्रवण संस्काराला महत्त्व देत त्याचा पाठपुरावा करणाऱ्या, मूल्यसंस्कारासाठी योगदान देणाऱ्या अशा आपल्या शिक्षकांच्या अनेक आठवणी लेखकाने जागविल्या आहेत. उद्योग आणि शिक्षणक्षेत्रांत मोठी कामगिरी करणाऱ्या लेखकाने आपल्या आयुष्याला वळण देण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या बागूल मॅडमच्या आठवणी जागवल्या आहेत.*

माणूस कितीही मोठा झाला, तरी बालपणीच्या स्मृती कायम राहतात. त्यातही प्राथमिक व माध्यमिक शाळेतील मित्र, शिक्षक व घटना मनावर कायमच्या कोरल्या जातात. प्रत्येकाच्या जीवनात एक शिक्षक असा येतोच, की त्यांच्यामुळे व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होते. संगमनेरच्या सराफ विद्यालयातील श्रीमती बागूल मॅडम माझ्या जीवनातील अशाच एक शिक्षिका !

अभ्यासाच्या बाबतीत मी स्वभावतः आळशी होतो. शारदा शाळेत मी चौथीला असताना माझी शिष्यवृत्ती परीक्षेची तयारी करून घेण्यासाठी माझ्या आईने बागूल मॅडमना विनंती केली. त्यांनी ती मान्य केली. घरात मारवाडी भाषा बोलत असल्याने, मराठी शाळेत असूनही माझे मराठीचे शुद्धलेखन व भाषा अशुद्ध होती. शिष्यवृत्ती परीक्षेची तयारी सुरू झाली आणि समानार्थी व विरुद्धार्थी शब्द घोटून घेण्याचे काम सुरू झाले. बागूल मॅडम तयारी करून घ्यायच्या आणि भरपूर गृहपाठ देऊन जायच्या. खेळाच्या नादात माझा गृहपाठ राहूनच जायचा, मग बागूल मॅडम हातावर छड्या मारायच्या, पण छडी मारताना त्यांच्या चेहऱ्यावर कधीच राग दिसला नाही, शिक्षा देऊन झाली, की लगेच तितक्याच प्रेमाने त्या पुढचा भाग शिकवायच्या. मला अभ्यासाची फारशी आवड नाही, हे लक्षात आल्यावर, त्यांनी मला गोष्टीची पुस्तके वाचायची सूचना केली. वडिलांनी भा. रा. भागवतांच्या 'फास्टर फेणे' या पुस्तकाची मालिका आणून दिली.

'चांदोबा' नावाचे मासिक घरी यायला लागले, अमर चित्रकथांची काही पुस्तके बाबांनी आणून दिली. त्याच वेळी संगमनेरमध्ये शिवचरित्रावरील व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली होती. शिकवणीला सुट्टी देऊन रोज व्याख्यान ऐकायला जाण्याची सूचना मला बागूल मॅडमने केली. मी व्याख्यानाला आलो की नाही, हे त्या तेथेच तपासायच्या. मला गोष्टी वाचायचा आणि ऐकायचा छंदच लागला. भाषा समृद्ध करण्यासाठी वाचन आणि श्रवण हा सर्वोत्तम मार्ग आहे. शिष्यवृत्तीची परीक्षा झाली. त्यात फारसे चांगले गुण मिळाले नसले, तरी वाचनाची गोडी लागणे हा मोठा फायदा झाला. बागूल मॅडम स्वतःकडची अनेक पुस्तके वाचायला देऊ लागल्या. पुस्तक वाचले की नाही याची खातरजमा केल्यानंतरच पुढचे पुस्तक मिळायचे.

पुढे मी माध्यमिक शाळेसाठी सराफ विद्यालयात दाखल झालो. तिथे कधी मराठी, कधी इतिहास तर कधी हिंदी शिकवण्यासाठी बागूल मॅडम आमच्या वर्गात

यायच्या. शाळेजवळच त्यांचे घर होते. आम्ही सायंकाळी त्यांच्या घरी जायचो. जाण्याची वेळ नक्की असली, तरी येण्याची वेळ नक्की नसायची. अनेक वेळा मॅडमनी घरी बनवलेला खाऊ आम्हांला हमखास मिळायचा. अभ्यास न केल्यास छड्या देणाऱ्या मॅडम अत्यंत स्नेहाने सर्व मुलांना आग्रहाने खाऊ खायला लावायच्या.

शाळेत एखादे शिक्षक आले नाहीत, तर त्यांच्या तासाला बागूल मॅडम याव्यात, असे सर्व विद्यार्थ्यांना वाटायचे, कारण अशा तासात त्या अभ्यास सोडून काहीतरी नवीन करायला लावायच्या. मला गोष्टी सांगायला त्या प्रवृत्त करायच्या. यामुळे वक्तृत्वकला आणि कथाकथनाचा सराव होत गेला.

शाळेच्या मधल्या सुट्टीत आम्ही शाळेसमोरच्या रस्त्यावर 'अप्पा-रप्पीचा' खेळ खेळायचो. शाळेची घंटा वाजली तरी २-४ मिनिटे खेळ चालायचा. एकदा छोटी घंटा झाली आणि मी फेकलेला चेंडू रस्त्यावरून जाणाऱ्या एका भाजीवालीच्या टोपलीला लागला, टोपली खाली पडली आणि भाजी रस्त्यावर विखुरली. वर्गात पोहोचायला उशीर झाला, तर बोलणी खावी लागतील म्हणून आम्ही शाळेत पळालो. हे दृश्य खिडकीतून बागूल मॅडमनी पाहिले. त्या वर्गात आल्या आणि मला बाहेर घेऊन गेल्या. भाजीवालीची क्षमा मागून मला तिची भाजीची टोपली भरायला लावली. त्या दोन-चार वाक्येच बोलल्या असतील; पण त्या दिवशी जीवनातील एक महत्त्वाचा धडा मला शिकायला मिळाला.

पुढे 'ययाती', 'छावा', 'मृत्युंजय' अशी मोठी पुस्तके वाचायला त्यांनीच मला उद्युक्त केले. शाळेत असताना वक्तृत्व स्पर्धेत भाग घेऊन मी अनेक बक्षिसे मिळवली. या यशात त्यांचा वाटा मोठा होता. आज व्याख्याता म्हणून मला अनेक ठिकाणी बोलावले जाते, याचे बीज बागूल मॅडमच्या शिकवण्यात रुजवले गेले यात शंका नाही.

एकदा मी बागूल मॅडमने छड्या मारल्या अशी तक्रार आईकडे केली. मला सहानुभूती दाखवण्याऐवजी मॅडमच कशा योग्य होत्या, असे सांगत आईनेदेखील त्यांचीच बाजू घेतली. एखाद्या शिक्षिकेविषयी इतका विश्वास पालकांच्या मनात असावा, ही त्या शिक्षिकेची तपश्चर्या असते.

असा एखादा शिक्षक जीवनात आला, की जीवन उजळून निघते. टाकीचे घाव पडले, की दगडाचीही सुंदर मूर्ती घडते. आजही गुरुपौर्णिमेला मी बागूल मॅडमकडे जाऊन नमस्कार केल्याशिवाय राहात नाही. रस्त्यात कोठेही मॅडम दिसल्या, की आपोआपच नतमस्तक होतो. शिक्षक दिनानिमित्त अशा समस्त शिक्षकांना मनःपूर्वक नमन!

**वर्गणीदार होण्यासाठी**

'जीवन शिक्षण' मासिकाची वार्षिक वर्गणी रु. ३००/- (रुपये तीनशे फक्त) आहे.

**https://scertmaha.ac.in/ jeevanshikshan/**

**या लिंकवर जाऊन तसेच क्यूआर कोड स्कॅन करून सुद्धा तुम्ही वर्गणीदार होऊ शकता.**

**संपर्क : jeevanshikshan@maa.ac.in**

# अशी झाली माझी जडणघडण

**संदीप वाकचौरे**
जि. प. शाळा कोंची, ता. संगमनेर,
जि. अहमदनगर
भ्रमणध्वनी : ९४०५४०४५००

*शालेय दिवसाची सुरुवात परिपाठाने होते. शाळेतील परिपाठ, त्यानंतरचा दिनक्रम याचबरोबर पहिलीपासून सर्वच इयत्तांसाठी लाभलेल्या; पण विशेष स्मरणात राहिलेल्या शिक्षकांची वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी आणि त्यांविषयी कृतज्ञता व्यक्त करणारा लेख. मागच्या पिढीत कौतुकाबरोबर शिक्षा व्हायची. शिक्षकांचे धपाटे म्हणजे प्रगतीचा राजमार्ग असे विधान त्यामुळेच लेखकाने केले आहे. जीवनाच्या घडणीत लाभलेले कृतिशील शिक्षण, कृषीविषयक अनुभव यांबरोबर विविध अनुभवांची मांडणी करणारा लेख. सदर लेखामध्ये केलेले वर्णन हे तत्कालीन परिस्थितीस अनुसरून असून सद्य:स्थितीत याचा अर्थाअर्थी संबंध लावणे टाळावे.*

मी ज्या शाळेत शिकलो त्या शाळेचे नाव 'जीवन शिक्षण विद्यामंदिर' असे होते. शाळा जिल्हा परिषद व्यवस्थापनाची होती. पूर्वी या शाळेला कृषी विषय असावा इतकी मोठी शेतजमीन होती. आम्ही शिकत असताना गुरुजींनी त्या जागेत शेती केलीही होती. शाळेची स्थापना १८७० मध्ये झाली, म्हणजे तशी फारच जुनी. शाळेला पूर्व-पश्चिम बांधलेल्या दोन दगडी इमारती होत्या. शाळेत अनेक मोठी माणसे शिकली होती. अर्थात हे आमचे वय वाढल्यावर समजले. भारताच्या कृषी क्रांतीचे जनक आणि माजी मंत्री अण्णासाहेब शिंदे यांचे प्राथमिक शिक्षण याच शाळेत झाले होते. याच शाळेच्या झाडाखाली दक्षिणेला तोंड करून आमचा परिपाठ होत असे. परिपाठासाठीच्या जागेत एक मोठे लिंबाचे झाड होते. तेथेच ध्वजाचा चौथरा होता. सकाळी सात वाजता शाळा भरायची. शाळेच्या बाहेर आणि अगदी बसस्थानकाजवळ, गावाच्या मध्यावर सर्वांना ऐकू जाईल अशी घंटा वाजवली जायची. ती घंटा म्हणजे पितळी धातूची थाळी होती आणि त्यावर वाजवण्यासाठी एक लाकडी गोल तुकडा असायचा. ते सर्व साहित्य घेऊन विद्यार्थी घंटा वाजवायचे. ही घंटा शाळा भरण्यापूर्वी नाही म्हटले तरी अर्धा तास आधी वाजवली जायची. आपल्याला घंटा वाजवायला मिळावी, म्हणून अनेक विद्यार्थी शाळेत लवकर यायचे. विद्यार्थ्यांमध्ये त्यासाठी मोठी चढाओढ असायची. गंगाधर शेळके नावाचे शाळेचे मुख्याध्यापक होते. अत्यंत सडपातळ बांधा, अंगावर नेहरू शर्ट, पांढरे स्वच्छ धोतर व छोटीशी मिशी. तसे ते निवृत्तीच्या मार्गावर होते, पण त्यांचा उत्साह प्रचंड होता आणि ते कडक शिस्तीचेही भोक्ते होते. गावातच राहत होते. ते कधी त्यांच्या मूळ गावी गेले, तरी सायकलचा प्रवास करून शाळेत वेळेवर हजर असायचे. त्यांनी कधीच उशीर केल्याचे स्मरत नाही. त्यांच्या कडक शिस्तीची भीती शाळेतील सर्वच गुरुजनांना होती, त्यामुळे ती आम्हा मुलांना पण असणार यात काय नवल! घंटा वाजवण्यापासून ते प्रार्थना म्हणण्यापर्यंत सर्व कसे शिस्तीत होईल यासाठी ते आग्रही असायचे. अनेकदा मुलांना घंटा कशी वाजवायची हेही घंटा हातात घेऊन शिकवायचे. कधी कधी थाळी वाजत नसायची. दोन्ही हातात असलेल्या साधनांनी झोका घेतल्याशिवाय जोरात आवाज येत नसायचा, पण त्यांनी शिकवूनही

येत नाही म्हटल्यावर, ते पाठीवर चांगलाच धपाटा मारायचे, मग दुसऱ्या मुलांचा शोध सुरू व्हायचा. सर्व कसे वेळेवर आणि उत्तम होईल याकडे त्यांचा कटाक्ष असायचा. ते शाळेच्या बाहेर नुसते उभे राहिले, तरी भीती वाटायची, त्यांचे अध्यापन कौशल्यही फार भारी होते. आम्ही काय पाठ करावे, हे ते सांगायचे. आम्ही उजळणी आणि पाढे पाठ करावेत, म्हणून ते आम्हांला त्यांच्या काळातील पावकी, दिडकी म्हणून दाखवायचे. त्यांना भरपूर कविताही पाठ होत्या. अत्यंत रसपूर्ण अशा त्या कविता ते मोठ्या आवाजात म्हणायचे, त्यामुळे आम्ही ही अगदी बेंबीच्या देठापासून कविता म्हणत असू. शाळा भरली, की बहुतेक वर्गात उजळणी सुरू व्हायची आणि शाळा सुटताना कविता म्हटली जायची. हा शिरस्ता जवळजवळ सर्व वर्ग पाळत होते. कोणत्याही वर्गात कविता सुरू झाली, की शाळा सुटण्याची वेळ झाली असे समजायचे. त्यामुळे मग आमचे गुरुजीदेखील दप्तर आवरून कविता म्हणण्यासाठी उभे करत असत.

खरे तर आमच्या वर्गाला बहुतेक निश्चित गुरुजी नसावेत. पहिलीच्या वर्गात प्रवेश घेतला, तेव्हा कराळे नावाचे गुरुजी होते. अत्यंत सडपातळ, स्वच्छ पांढरा शर्ट, पायजमा घातलेले आणि चेहरा कायम हसरा. त्यांची गाणी फार छान असायची. पुस्तकात नसलेली अनेक गाणी आम्हांला म्हणायला लावायचे. त्यांना ज्या चाली येत होत्या, त्या बालवयातही त्यांच्या मागोमाग म्हणता येतील इतक्या सोप्या असायच्या. ते पुस्तक शिकवता शिकवता अनेक बडबडगीते, गाणी म्हणून घेत असत. गोष्टीदेखील छान सांगत, त्यामुळे आपोआपच आनंद घेत घेत अभ्यासाकडे लक्ष लागत होते. अधूनमधून ते रागावत असत, पण ते तेवढ्यापुरतेच. त्यानंतर काही दिवसांनी झुंबरलाल सासवडे नावाचे गुरुजी आले. अत्यंत धष्टपुष्ट शरीरयष्टी, पायजमा आणि शर्ट असा पेहराव, नाकाखाली अत्यंत मोठ्या, पिळदार मिशा. त्यांना पाहून अगदी लोकमान्य टिळकांची आठवण व्हायची. सकाळी वर्गात आले, की शिकवायला सुरुवात व्हायची. साधारणपणे दिवसभराचे अभ्यासाचे वेळापत्रक ठरलेले असायचे. सकाळी शाळा भरली, की मराठी भाषा, त्यानंतर परिसर अभ्यास. दुपारची शाळा भरली, की सुरुवातच गणिताने आणि मधल्या सुट्टीनंतर सामाजिक शास्त्राचे तास असायचे. वेळ मिळालाच, तर खेळ घेतले जायचे. त्यांची शिकवण्याची धाटणी चांगली होती. शिकवताना कधी कधी आमचे लक्ष नसायचे, मग ते उभे करून प्रश्न विचारायचे. लक्ष नाही म्हटल्यावर उत्तर तरी कसे येणार? मग उत्तर नाही आले, की पाठ लाल व्हायची. खरी भीती तर दुपारच्या सत्रात वाटायची; कारण गणिताचा तास म्हणजे अनेकांना मार ठरलेला असायचा. त्यांनी गणित शिकवले, की आलेच पाहिजे असेच त्यांना वाटायचे. अत्यंत तळमळीने ते शिकवायचे; पण काहींना ते जमत नसेल, तर त्यांना मार पडायचा आणि ज्यांना ते गणित आले आहे, त्यांचा चेहरा उजळून निघायचा. पाढे पाठांतरावरही त्यांचा भर असायचा. त्यांनी सांगितलेल्या गोष्टी केल्या नाहीत, की मग ते रागवायचे. त्यांचा राग सहन करणे विद्यार्थी म्हणून जिवावर यायचे, पण पर्याय नसायचा. दुपारी इतिहासाचा तास असायचा, तेव्हा त्यातल्या सनावळ्या मानगुटीवर येऊन बसत. गणिताचा मार चुकला, तर सनावळ्या पाठ लाल करून जायच्या. अभ्यास केला, तर पाठीवर कौतुकाची थाप मिळायची. सरांची सुरेखा नावाची मुलगी आमच्या वर्गात होती, पण वर्गात तिला काही आले नाही, तर तिलाही मार बसायचा. मग तक्रार करायला जागा नसायची. घरी सांगितले, तर पुन्हा घरी मार बसायचा, म्हणून सांगायलाच नको. बरे त्यांचे आणि पालकांचे संबंधदेखील चांगले असायचे. सारे गाव त्यांना 'बाबा' म्हणायचे. ते स्वाध्याय परिवाराचे उपासक होते, त्यामुळे दर गुरुवारी आणि रविवारी रात्री गावात

परिवाराचा कार्यक्रम व्हायचा. त्यात गावातील अनेक पालक सहभागी व्हायचे. त्यामुळे मुख्य उपासक अशीच त्यांची प्रतिमा होती. ते आमचे गुरुजी होते हे खरे; पण ते संपूर्ण गावाचे 'बाबा' होते. त्यामुळे शाळेत काही प्रताप केलाच, तर घरी कळणार हे सर्वांनाच ठाऊक होते. त्यामुळे जितके म्हणून शिस्तीत राहून अभ्यास करता येईल, तेवढे शिस्तीत राहण्याकडे आमचा कल होता.

गुरुवारी गावचा बाजार असायचा. शेतकरी असलेल्या पालकांनी विक्रीसाठी भाजीपाला बुधवारी रात्री किंवा गुरुवारी सकाळी काढलेला असायचा. अनेक मळ्यात राहणाऱ्या मुला-मुलींच्या दप्तरात गुरुवारी वानोळा म्हणून भाजीपाला हमखास असायचा. मग सकाळी येताना गुरुजी रिकामी पिशवी घेऊन आलेले असायचे. अर्थात मुलांनी आणलेले घेऊन जाण्यासाठी नाही; पण साडेदहाला शाळा सुटली, की जाताना बाजार करून घरी जाता येईल म्हणून. पिशवी सकाळीच भरून जायची. मधली सुट्टी झाली, की पिशवी घरी पोहोचवण्यासाठी दोघांचा नंबर लागायचा. कधीकधी माझ्यावरही वेळ यायची. तो भाजीपाला पोहोचवण्यात मोठा आनंद वाटायचा. त्या दिवशी मुलांनी काही फळे आणली असतील, भुईमुगाच्या शेंगा आणल्या असतील, तर आम्हा मुलांनादेखील मिळायच्या. सगळेच घरी न्यायचे असे काही नव्हते. घरी पोहोचवल्यावर बाई पण काही तरी हातावर ठेवायच्या. गुरुजी आध्यात्मिक मार्गाचे असल्याने, शक्य होईल तितक्या संस्कारांच्या गोष्टी आमच्या वाट्याला येत असत. त्या गोष्टींतून जीवनाचा अर्थ उलगडून दाखवणे घडायचे, पण तेव्हा कुठे त्याचा अर्थ कळत होता? 'छान छान गोष्टी' नावाचे एक पुस्तक होते अभ्यासाला. त्या गोष्टी गुरुजी फार रंगवून सांगायचे. जीवन शिक्षणाचे धडे देण्यावर त्यांचा अधिक भर असायचा. शनिवारी अर्धा दिवस शाळा असायची; पण ती शाळा नाहीच, तर जीवन शिक्षणाचा धडा असायचा. शनिवारी वर्ग सारवणे असायचे, तेव्हा मुलांनी बादली घेऊन पाणी आणणे आणि मुलींनी वर्ग सारवणे व्हायचे. पाणी नदीवरून आणले जायचे. बादली भरून पाणी आले असे कधीच झाले नाही. विद्यार्थ्यांच्या जोड्या केलेल्या असायच्या. आम्ही पाणी आणून शेणात ओतायचो आणि मुलींनी शेणाने सारवायचे. त्या मुलींनी जीवनाचा पाठ शाळेत गिरवला. कधीकधी आम्ही मुलेही सारवण्यात सहभागी व्हायचो. कसे सारवतात हा अनुभव अधिक आनंद देणारा वाटायचा. चुका झाल्या, तर गुरुजी काठी घेऊन उभे राहत आणि सांगत. त्या दिवशी सर्व मुलांचे कपडे ओलेचिंब आणि मुलींचे कपडे शेणाने भरलेले असायचे, पण कधी कोणी पालक शाळेत तक्रार घेऊन आल्याचे आठवत नाही. रोजची वर्गसफाई आम्हीच करायचो. मुलांनीदेखील हे काम करावे असा त्यांचा आग्रह असायचा. आज लिंगसमभावासाठी प्रयत्न केले जातात, पण ते सारे पाठ गुरुजींनी आमच्याकडून जगण्याच्या शाळेतून गिरवून घेण्याचा प्रयत्न केला. सकाळी एकदा आणि दुपारी एकदा सर्व गुरुजी कार्यालयात एकत्र बसायचे. तोपर्यंत आमचे वर्ग सुरू झालेले असायचे. वर्ग सेक्रेटरीला दिलेले काम तो इतर विद्यार्थ्यांकडून करून घ्यायचा. आमचा वर्ग आणि कार्यालयाचा दरवाजा समोरासमोर होता. कार्यालयातून कोणत्याही गुरुजींनी दोन बोटे दाखवली, की आम्ही धावतपळत सुटायचो. दरवाजात उभे राहिले, की अकरा, पंधरा अशी काही तरी संख्या सांगितली जायची आणि मग आम्ही सरळ हॉटेलकडे धाव घ्यायचो. एकाच्या हातात चहाची किटली आणि दुसऱ्याच्या हातात काचेचे ग्लास असे ठरलेले. शाळेत गेले, की आपणच तो चहा ओतायचा आणि वाटायचा. योग्य प्रमाणात भरला की नाही यावर गुरुजींचे लक्ष असायचे आणि शेवटी किती पैसे झाले असे विचारून ते हिशोब करायला सांगत. तेथेच व्यावहारिक गणिताचा

आमचा पाठ घेतला जात असायचा. तेथेच प्रमाण, आकडेमोड बरेच काही शिकलो. शिष्टाचाराचा धडाही तिथेच गिरवला. पाहुणे कोण आले आहेत, त्यांना प्रथम चहा द्यायचा. मग मुख्याध्यापक आणि मग शिक्षक असे त्यांनी सांगितलेले. जीवनाला उपयोगी पडेल असे शिक्षण त्यांच्याकडून मिळत गेले. पुस्तकातील पाठ शिकवता शिकवता आयुष्याची गणिते सुटतील यासाठी पेरणी करायचे. तेव्हा फार काही कळत नसायचे, पण आज त्यांनी जे काही पेरले आहे त्याचे महत्त्व समजते. पुढे काही काळ जालिंदर हासे नावाचे गुरुजी आले. ते शिस्तीचे अत्यंत भोक्ते. त्यांना थोडीशीदेखील बेशिस्त सहन होत नसायची. त्यांच्या भीतीने आपण प्रत्येक गोष्ट वेळेवर करावी असा धडा शिकलो. त्यांचे बोलणे नेमकपणाचे असायचे. प्रत्येक गोष्ट आपल्या विद्यार्थ्यांना यावी यासाठी त्यांचा अट्टहास असायचा.

आम्ही बहुतेक तिसरीत असू, तेव्हा शाळेच्या शेतीच्या जागेत एरंड लावली होती. खूप दाट आली होती. पाणी देणे, मशागत असे सर्व केले जात होते. त्याला फळेही चांगली आली होती. त्यातील प्रत्येक टप्प्यावरचा धडा गुरुजी प्रत्येक वर्गातील मुलांना मिळेल असे पाहत होते. गांधीजींनी 'थ्री एच' शिक्षणाचा सांगितलेला विचार शाळेत प्रत्यक्ष अनुभवायला मिळत होता. गुरुजींनी सांगितलेली प्रत्येक गोष्ट आपण केली, की त्याचा अत्यंत अभिमान वाटायचा. त्यातून शिकणे व्हायचे. प्रत्येक शिक्षक कोणत्याही वर्गातील विद्यार्थी असला, तरी लक्ष ठेवून असायचे. त्यामुळे कोणत्याही वर्गातील विद्यार्थ्याने चूक केली, की धपाटे ठरलेले असायचे. तेव्हा लागलेला मार नकोसा वाटायचा; पण आज कळते, की ते धपाटे म्हणजे जीवन उन्नतीचा राजमार्ग होता. प्राथमिक शाळेतून माध्यमिक विद्यालयात पाचवीला प्रवेश झाला. रयतमधील संस्कारांचा वस्तुपाठ गिरवताना बरेच काही शिकायला मिळाले. तिथे बोऱ्हाडे विजय नावाचे शिक्षक होते. प्राथमिक शाळेत शिक्षकांनी वक्तृत्वाची करून दिलेली ओळख अधिक प्रकाशमान करण्यासाठी विद्यालयात अधिक प्रयत्न झाले. दोन तालुक्यांत कोठेही स्पर्धा असली, की बोऱ्हाडे सर विषय सांगणार. ते भाषण लिहिण्यास सांगणार. त्या संदर्भातील पुस्तके ग्रंथालयातून देणार. मग भाषण तयार झाले, की ते वाचणार. त्यात दुरुस्त्या करणार. ते स्वतः स्पर्धेला घेऊन जाणार. सारा प्रवास बसचा असायचा. त्यातून वाचनाचा छंद लागला. विचार करायला शिकलो. काय महत्त्वाचे असते, ते कसे जाणून घ्यायचे, हा पाठ तेथेच गिरवला. शाळेतील प्रत्येक स्पर्धेत सहभाग ठरलेला असायचा. अनेकदा बक्षीस नाही मिळाले, की ते म्हणायचे, ''बक्षिसासाठी नाही बोलायचे. आपल्याला काही सांगायचे आहे. त्यातून आपण विचार करतो. माणूस आहोत ना, मग बोलत राहायचे.'' प्रत्येक गोष्ट आनंदासाठी करायची असा त्यांचा आग्रह असायचा. खरे तर त्यावेळी ते काय सांगत आहेत आणि ते जीवनात किती महत्त्वाचे आहे हे कळतच नव्हते, पण आज मात्र ते सारेच जीवन व्यापून आहे, हे लक्षात येते. त्यांनी दाखवलेली वाचनाची आणि लेखनाची वाट आज जीवनाची सोबत करत आहे. तेव्हा भोसले नावाचे दाढी वाढवलेले एक शिक्षक होते. ते कर्मवीरच वाटायचे. ते फार छान गोष्टी सांगायचे. त्यांनी तेव्हा एक गोष्ट सांगितली होती, की ज्या वाटेने अधिक लोक जातात ती वाट तुडविण्यापेक्षा वेगळी वाट निवडा. जे कोणी करत नाहीत ते करण्याचा प्रयत्न करा. असे काही तरी होते ते, पण ती वाक्ये आजही मनावर कोरल्यासारखी वाटतात. नुकतेच शाळेत एस. बी. बनकर नावाचे अत्यंत तरुण शिक्षक बदलून आले होते. बी. एससी., बी. एड होते. परिपाठ सुरू असताना आम्हा विद्यार्थ्यांचा कोणत्या तरी शब्दाच्या लेखनावरून वाद सुरू होता. परिपाठाच्या रांगा होत होत्या, तरी आमचे लक्ष नव्हते. मग ते आले आणि 'काय सुरू आहे?' म्हणून विचारू लागले, तर मुलांनी

त्यांनाच विचारले; मॉडर्न मधील कोणता शब्द अचूक आहे? तर ते म्हणाले, ''संदीप जो सांगतो तो अचूक.'' माझा शब्द अचूक, हा त्यांनी दाखवलेला विश्वास होता. त्यानंतर आपण जे वाचायचे आणि लिहायचे ते अधिक योग्यतेने असा मी जणू धडा गिरवला होता. आपले शिक्षक आपल्यावर विश्वास ठेवतात या एका प्रसंगाने शिक्षकांप्रति विश्वास, प्रेम वृद्धिंगत झाले होते. चित्रकला शिकवायला तेव्हा सुरेश मुळे नावाचे शिक्षक होते. त्यांनी सतत असाच विश्वास दाखवला. अनेक शिक्षक वर्गपाठाची वही तपासण्यास सांगायचे. त्यामुळे आपला अभ्यास अधिक चांगला असायला हवा असे वाटायचे, त्यामुळे शिकताना अधिक चांगले शिकायचे असा अप्रत्यक्ष धडा मिळाला होता. शिक्षकांनी ज्या अनेक वाटांनी विद्यार्थ्यांना घडवायचे असते, त्यासाठी जाणीवपूर्वक काही केले नसले, तरी त्यांनी जे काही पेरले त्यातून जीवनाला उभारी मिळाली आहे, हे कसे नाकारता यईल. अत्यंत साधी राहणी, उच्च विचारसरणी असे ते शिक्षक होते. अरविंद देशमुख नावाचे एक शिक्षक होते. ते अत्यंत कडक शिस्तीचे होते. त्यांचा गुणवत्तेवर अधिक भर असायचा. विद्यार्थ्यांनी अजिबात चूक करू नये, असेच त्यांना वाटत होते. त्यामुळे कधी चूक केली, तर पाठ लाल व्हायची, पण यामुळे त्यांच्या विषयाचा अभ्यास मात्र नियमित केला जाऊ लागला. अधिक दक्षतेने तो केला जायचा. पाठक नावाच्या शिक्षकांचा कार्यकारणभाव आणि प्रत्येक गोष्ट समजून करायची यावर अधिक भर असायचा. विज्ञानातील प्रत्येक घटना कशी घडते आणि तिचे काय परिणाम होतात, हे ते फार छान सांगायचे. विज्ञान म्हणजे केवळ माहिती नाही, तर जीवनाच्या प्रगतीची वाट आहे, असे ते म्हणत असत. प्रत्येक वाक्याचा नेमका अर्थ, ते सांगत असायचे. शब्द आणि त्यात दडलेला अर्थ जाणून घेण्यासाठी प्रयत्न करायचा असतो हा दृष्टिकोन त्यांनी दिला होता. विज्ञानातील अनेक गमतीजमती ते सांगायचे. अत्यंत नेटकेपणा त्यांच्यात होता. मार्कांसाठी शिकायचे नाही हे त्यांनी प्रथम मनावर बिंबवले होते. मी केवळ मार्कांपुरता विचार केला असता, ते भर वर्गात म्हणाले ''तुला किती मार्क हवेत?'' तर मी म्हणालो, ''पैकीच्या पैकी'' त्यांनी ते दिले, पण मला समाधान नाही मिळाले; तेव्हा ते म्हणाले, ''शिकणे म्हणजे मार्क नाही, तर आपल्याला ते कळणे महत्त्वाचे आहे.'' अशा छोट्या छोट्या गोष्टी त्यांनी मनावर बिंबवल्या. विज्ञान शिकवता शिकवता त्यांनी विज्ञानातील कथा, वैज्ञानिकांच्या जीवन प्रवासातील अनुभव कथन केले. त्यातून उत्सुकता निर्माण झाली. वाचनाची वाट चालण्याचा प्रयत्न त्यातून घडत गेला. मांढरे नावाचे सर गणित शिकवायचे. कसलाच तणाव नाही. अगदी हसत-खेळत ते शिकवायचे. कोणाला कसल्यातरी टोपण नावाने हाका मारायचे; त्यामुळे सतत वर्गात हास्याचे कारंजे असायचे. चुकले तरी शिक्षा नाही. मधली सुट्टी झाली, की मग टोपण नावानेच सर्व जण चिडवायचे. हा आनंद होता, शिकणे मजेशीर होते. उमेश डोंगरे नावाचे उपशिक्षणाधिकारी आधी मला शिक्षक होते. त्यांच्याकडून पुस्तकातील कमी आणि जीवनाविषयी अधिक शिकलो. त्यांनी जीवनाशी व परिस्थितीशी दोन हात करण्यासाठीची शक्ती दिली. शिक्षकांनी दिलेला वस्तुपाठ हाच जीवनातील प्रवासाचा मार्ग होता. आज शिक्षक दिन साजरा होत असताना, आपले शिक्षक पुन्हा मागे जाऊन आठवताना, त्यांच्या चरणावर नतमस्तक व्हावे असे पुन्हा पुन्हा वाटत राहते. जीवनात हे शिक्षक आलेच नसते तर, असा प्रश्न पडतो. शिक्षक म्हणजे विनोबांच्या भाषेत 'आचार्य' होते. त्यांचे जगणे हाच आमच्यासाठी पुस्तकापलीकडील जीवनाचा धडा होता. तोच गिरवत आजवरचा प्रवास सुरू आहे.

# असे शिक्षक होणे नाही !

**नंदा कुलकर्णी**
भ्रमणध्वनी : ९०२८३४२७०४

*शिक्षक प्रशिक्षणाच्या काळात भेटलेल्या आणि त्यांच्या वैशिष्ट्यांमुळे, गुणांमुळे लक्षात राहिलेल्या काही शिक्षकांविषयीचे अनुभवकथन या लेखात केले आहे. 'माझे विद्यार्थी, माझी मुले' या नात्याने मुलांच्या संरक्षणाची जबाबदारी सांभाळणारे चाफेकर सर तर, स्वतःच्या कौटुंबिक अडचणीपेक्षा स्वतःच्या पेशाला अधिक महत्त्व देत. कर्तव्यपरायण असलेल्या गद्रे बाई, विद्यार्थिनींच्या घरी जाऊन तास घेणाऱ्या लेले बाई अशा गुरुजनांची विविध रूपे या लेखात भेटतात व मनावर नकळत संस्कार करून जातात.*

पाच सप्टेंबरचा शिक्षक दिन, गुरुपौर्णिमा या दिवशी मन भूतकाळात फिरून आल्याशिवाय राहात नाही. शाळेचे दिवस आठवतातच, पण महाविद्यालयातले दिवसही आठवतात.

आमच्यावेळी ११ वी मॅट्रिक होती, त्यामुळे ११ वर्षांचे शालेय जीवन आठवते. प्राथमिक, माध्यमिक शाळेच्या आठवणी सरळसोट आहेत. कोण्या शिक्षकांचा फारसा विशेष प्रभाव पडल्याचे स्मरत नाही, याचे कारण त्या अकरा वर्षांत माझ्या नऊ शाळा झाल्या. वडिलांची बदली झाली, की नवीन गाव! त्यामुळे शाळेत रुळेपर्यंत शाळा बदलायची वेळ यायची, पण दौंडच्या शे. जो. विद्यालयाची एक आठवण खास आहे.

शाळेत अनेकदा काही समारंभाच्या, व्याख्यानाच्या निमित्ताने सगळे वर्ग मैदानावर बोलावले जातात. रांगेने बसविले जाते. समोर स्टेजवर प्रास्ताविक, भाषण इत्यादी चालू होते. आमच्याही शाळेत हे घडायचे. भाषण ऐकायचे ते वय नव्हते; साहजिकच मातीत रांगोळी काढ, खडे गोळा कर, हळूच मागेपुढे खडा टाकून खुसूखुसू हसणे हे उद्योग चालायचे. प्रत्येक रांगेमागे मुले शांत बसावीत म्हणून शिक्षकांचा खडा पहारा असे. सरांच्या मोठ्या डोळ्यांकडे बघत आमचे उद्योग चालू. एकदा हे थोडे जास्तच झाले आणि सरांनी त्याविषयी चांगलीच 'शाळा' घेतली. आम्ही पण, 'सर, ते किती रटाळ बोलत होते' अशी कैफियत मांडली. सरांनी ऐकून घेतले आणि त्यांनी त्यावर जे सांगितले ते फारच छान होते. सर म्हणाले, ''हे बघा इथून पुढे अशा कार्यक्रमासाठी मैदानावर येताना रफ वही, पेन घेऊन यायचे. भाषण ऐकताना काय चुकले, कोणता शब्द चुकीचा वापरला गेला, कर्ता, क्रियापद, विशेषण यांची काय गफलत झाली, कुठे विसंगत वाटले ते लिहायचे. बघू कोण नेमकेपणाने बरोबर लिहिते.''

चॅलेंज म्हटल्यावर आमचा मैत्रिणींचा ग्रुप सरसावला आणि आम्ही अशा कार्यक्रमांची वाट पाहू लागलो. तेव्हापासून लक्ष देऊन, एकाग्रपणे ऐकायची सवय लागली, अचूक शब्द शोधायची सवय लागली. बोलताना कुठे, कसे चुकत जाते हे कळायला लागले आणि या गोष्टींचा पुढील आयुष्यात खूप उपयोग झाला. शिक्षकीपेशात आल्यावर तर मला याचा खूप फायदा झाला.

माझ्या शाळा जशा पुष्कळ झाल्या, तशी महाविद्यालये पण चार वर्षांत चार झाली. पहिल्या वर्षी वाडिया कॉलेजला टी. डी. ला असतानाची आठवण विशेष आहे. जंगली महाराज रस्त्यावरील मॉडर्न

हायस्कूलमध्ये पाठ असत. सुट्टीनंतरचा तास सुरू झाला. तेवढ्यात एक मोर्चा आला. दगडफेक सुरू झाली. प्राथमिकच्या चाफेकर सरांनी गांभीर्य ओळखून वर्गाची दारे लावायला सांगितली. माझा लेसन होता, तो वर्ग गेटसमोरच होता. सर स्वतः दोन हात आडवे करून गेटजवळ उभे राहिले. एक लहानसा दगड त्यांना लागलाही, पण 'माझे विद्यार्थी पालकांनी माझ्या भरवशावर शाळेत पाठविलेले असतात; त्यांचे संरक्षण ही माझी पहिली जबाबदारी' असे ठणकावून सांगत ते ठामपणे उभे राहिले. शिक्षकांनी आपल्या विद्यार्थ्यांच्या पाठीमागे असे ठामपणे उभे राहिले पाहिजे. 'माझे विद्यार्थी माझी मुले' ही भूमिका या पेशात असली पाहिजे हा संस्कार तिथे दृढ झाला.

संगमनेर कॉलेजमधील प्राध्यापकांची आठवण अशीच हृद्य आहे. प्रा. विमल लेले आम्हांला संस्कृत शिकवायच्या. केवळ त्या शिकवायला आहेत म्हणून संस्कृत घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या जास्त असायची. आमच्या वर्गातली एक मुलगी विषमज्वराने आजारी होती.त्यामुळे कॉलेजला येऊ शकत नव्हती. ताप उतरल्यावरही कॉलेज लांब असल्याने आणि सायकलने यावे लागत असल्याने अशक्तपणामुळे तिला तेही शक्य नव्हते. तिचे तास बुडू नयेत म्हणून बाईंनी (आमच्यावेळी बाईंच्या मॅडम झाल्या नव्हत्या) तिच्या घरी तास घ्यायचे ठरवले. आम्ही विद्यार्थी आणि बाई तिच्या घरी जायचो. ती कॉटवर पडल्या पडल्या ऐकायची. प्रत्येकाकडून जास्तीतजास्त अभ्यासकरून घ्यायचा हा बाईंचा निश्चय. सगळ्यांना ९० च्यावर गुण मिळाले पाहिजेत, असा त्यांचा ध्यास असे आणि ते प्रत्येक वर्षी शक्य झाले. एकदा विद्यापीठाने सगळ्यांचे इतके गुण पाहून मासकॉपी नाही ना, अशी चौकशीही केली होती. प्राचार्य कौंडिण्य यांनी हा किस्सा सांगितला, तेव्हा ते अधिकारीही चकित झाले. लेलेबाईंचे विद्यार्थी त्यांच्या अनेक संस्कारांची शिदोरी घेऊन कॉलेजमधून बाहेर पडले, जी शिदोरी आजही त्यांना उपयोगी येत आहे. दुसऱ्यांच्या हितासाठी, भल्यासाठी शक्य असेल तेवढे झटणे हा माणुसकीचा संस्कार रुजविणाऱ्या लेलेबाईंचा ठसा कायम ठळकच राहणार आहे.

बी.एड्.ला टिळक महाविद्यालयात शिकत असताना तर, शिक्षकाने कसे असावे याचे पावलोपावली दर्शन व्हायचे. त्या एका वर्षात जे काही शिकायला मिळाले; त्याला तोड नाही. ताम्हणकर नावाचे प्राध्यापक होते. उत्तरपत्रिका कशी तपासावी याचा आदर्श वस्तुपाठ त्यांच्याकडून मिळाला. उत्तराचे दहा मुद्दे असतील, तर त्याचे उपमुद्दे, काठिण्यपातळी पाहून ते पाव, अर्धा असे गुण द्यायचे. उत्तरपत्रिका मिळाल्यावर, 'इथे एवढेच गुण का? बेरीज चुकली' अशी शंका घेऊन विद्यार्थी टेबलाशी येता कामा नये, असे तपासणे हवे' असे ते वारंवार सांगायचे.

माझ्या वाटचालीत त्यांचे ते सांगणे मी आचरणात आणले, म्हणूनच आज साठीकडे वाटचाल करत असलेले विद्यार्थी भेटले आणि 'बाई, पेपर तपासावा ते तुम्हीच' अशी त्यांनी आठवण काढली, की मी मनोमन सरांना नमस्कार करते आणि कृतज्ञतेने मुलांना त्यांची आठवण सांगते.

टिळक कॉलेजमध्ये अनुभवलेली आणखी एक गोष्ट सहसा कुठे आढळणार नाही. प्रत्येक विषयाचे प्राध्यापक आपापल्या विषयांचे लेसन पाहात. शिक्षकखोलीत कोण लेसन चांगला घेतो, कोण पैकीच्या पैकी मार्क मिळवू शकेल यांवर चर्चा होत असे. माझा याबद्दलचा अनुभव अविस्मरणीय आहे. माझ्या संस्कृतच्या प्राध्यापिका हेमा क्षीरसागर लेसन नोट्स चार-चार वेळा तपासून द्यायच्या. 'लेसन उत्तम झाला पाहिजे' हा ध्यास. प्रा. गद्रे बाई इंग्रजी आणि संस्कृतच्या. इंग्रजीचे पुष्कळ विद्यार्थी असल्याने त्यांच्याकडे संस्कृतचे पाठ लागत नसत. माझ्या बाईंना मात्र गद्रे बाईंनी माझा एक तरी तास बघावा असे वाटे. शेवटचा पाठ त्यांनी त्यांच्याकडे

लावायला सांगितला, म्हणाल्या, ‘अगं, माझ्या नजरेतून तुला काही सूचना सांगायच्या राहून गेल्या असे होऊ नये म्हणून त्यांना बघू दे हा शेवटचा पाठ, तुझा मार्क कुठेही जायला नको.’ ते ऐकून क्षीरसागर बाईंबद्दलचा आदर अधिकच दुणावला. ठरल्याप्रमाणे हुजूरपागेत पाठ बघायला गद्रे बाई आल्या. तास मधल्या सुट्टीनंतर होता. नियमाप्रमाणे मी अर्धा तास आधी पोहोचले होते. गद्रेबाई पण आल्या होत्या.

आम्ही दोघीही सुटी संपायची वाट पाहात वर्गापाशीच उभ्या होतो. बाई फार अस्वस्थ वाटत होत्या. चेहऱ्यावर काळजी दिसत होती. मला राहवेना. शेवटी मी त्यांना विचारले, तर त्या म्हणाल्या, ‘‘अगं मुलगी बाळंतपणाला आली आहे. पहिलटकरीण ... पहाटे ॲडमिट केले आहे; पण तुझा हा शेवटचा पाठ. नंतर वार्षिक परीक्षाच, म्हणून मी आले आहे.’’ मी थक्क झाले, म्हणाले, ’’बाई जा तुम्ही. कोणीही बघेल हा पाठ,’’ तरी बाई काही जाईनात. तेवढ्यात मनात एक विचार आला आणि वर्गासमोरच्या व्हरांड्यात डबा खाणाऱ्या मुलींना मी विचारले, ‘‘तुम्ही आता वर्गात तासाला बसू शकता का? या मॅडमना घाईने घरी जायचे आहे. आपण सुट्टीत तास सुरू करू या?’’ ‘होऽऽ’ असे म्हणत मुली वर्गात गेल्या. दोन मिनिटांत तास सुरू झाला. उपयोजनापर्यंत आल्यावर मी बाईंना म्हणाले, ‘‘बाई, आता तुम्ही निघा.’’ बाई गेल्यानंतर मी पाठ पूर्ण केला. मुलींचे आभार मानले. घरी जाताना रस्ताभर बाईंची आपल्या पेशावरची निष्ठा, कुठलाही अहं न बाळगता गद्रेबाईंना ‘माझ्या विद्यार्थिनीचा पाठ ‘बघा’ असे सांगणाऱ्या क्षीरसागरबाईंच्या मनाचा मोठेपणा हे सगळे डोळ्यांपुढे येत होते आणि असे शिक्षक मिळणे हे आपले मोठे भाग्य आहे, असे वाटून माझ्याच भाग्याचा मला हेवा वाटला. अशा शिक्षकांची आठवण नित्य येत असते नव्हे; आठवण यायला ते विस्मरणात गेलेलेच नसतात. अभ्यास विषयातल्या संकल्पना, संबोध त्या-त्या इयत्तांमध्ये शिक्षकांनी शिकवल्या. शैक्षणिक करिअर घडवताना त्यांचा उपयोग झाला, त्याचबरोबर वर उल्लेखिलेल्या शिक्षकांनी जे विशुद्ध पाथेय बरोबर दिले, जीवनदृष्टी दिली, जी माझ्यासारख्या शिक्षकाला आयुष्यभर खऱ्या अर्थाने उपयोगी पडली हे निश्चित. तसे तर जीवनप्रवासात कितीतरी ज्ञात-अज्ञात गुरूंनी नकळतपणे खूप काही दिले आहे; त्या सर्वांना शिक्षकदिनाच्या निमित्ताने सविनय वंदन!

◈◈◈

---

**(पृष्ठ क्र. २८ वरून)**

केले जातात. अशा वेगवेगळ्या पद्धतीने विद्यार्थी शिक्षकांचा सन्मान करतात. प्रसंगी पुष्पगुच्छ, भेटवस्तू, भेटकार्ड देऊन शिक्षकांप्रति आभार व्यक्त करतात. शिक्षकांसाठी हा दिवस पुनश्च त्यांच्या कर्तव्यांबद्दल आणि बांधिलकीबाबतची जागरूकता निर्माण करणारा असण्याबरोबरच विद्यार्थ्यांसाठीसुद्धा हा दिवस खास होऊन जातो.

एकंदरीत, जीवनाला दिशा देण्यात आणि आपली जडणघडण करण्यात गुरूंचा खूप मोठा वाटा असतो. त्यामुळे शिक्षक दिनाला भारतीय संस्कृतीत अनन्यसाधारण महत्त्व आहे; म्हणून शिक्षकांनाही पालकांच्या बरोबरीचे स्थान दिले जाते.

भारतामध्ये सर्वप्रथम सन १९६२ मध्ये ‘शिक्षक दिन’ साजरा करण्यात आला, तर युनेस्कोने ५ ऑक्टोबर हा दिवस ‘आंतरराष्ट्रीय शिक्षक दिन’ म्हणून १९९४ मध्ये जाहीर केला.

या शिक्षक दिनानिमित्त माझ्या जीवनात विविध प्रसंगी व आयुष्याच्या प्रत्येक वळणावर लाभलेल्या गुरुजनांप्रति आदर व कृतज्ञता व्यक्त करतो. सर्व शिक्षकांना शिक्षक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

◈◈◈

# मारक्या गुरुजींनी तोल सावरायला शिकवले

**उत्तम कांबळे**
पूर्वाध्यक्ष,
अ. भा. म. साहित्य संमेलन, जि. नाशिक
भ्रमणध्वनी : ९८८१०९९१४३

*ज्येष्ठ पत्रकार, प्रसिद्ध लेखक, साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष उत्तम कांबळे यांनी त्यांच्या शालेय जीवनातील मारकुट्या मास्तरांच्या आठवणी जागवल्या आहेत. 'छडी लागे छमछम' असाच तो काळ होता. पालकांपासून सर्वांचाच शिक्षेमुळेच मुले शिकतात, असा समज होता. शिक्षक विद्यार्थ्यांना शिक्षा करत; पण त्यामागे संस्कार आणि जडणघडणीचीच भूमिका होती. एका प्रसंगी त्या शिक्षकांनी लेखकाला केलेला उपदेश आणि त्यातील वाक्ये सुभाषिताप्रमाणे लेखकाच्या मनावर कोरली गेली. आज परिस्थिती बदलली आहे. शिक्षण बालककेंद्री झाले आहे. शिक्षा हद्दपार झाली आहे. आनंददायी शिक्षण ही संकल्पना मूळ धरते आहे, पण एक काळ 'शिक्षेच्या' महत्त्वाचा होता. त्याची आठवण म्हणूनच या लेखाकडे बघायला हवे आणि हेही महत्त्वाचे दिसून येते, की त्यातून झालेले संस्कारच मुलांच्या कायम आठवणीत राहिले.*

मला नक्की आठवतं, की तो महाराष्ट्रातील भीषण दुष्काळाचा काळ होता. तेव्हा मी महाराष्ट्रात टाकळीवाडी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतून सहावी पास होऊन, शिरगुप्पी या कर्नाटकातील माझ्या जन्मगावी पुन्हा सहावीतच बसलो. महाराष्ट्रातून आलेल्या विद्यार्थ्याला एक वर्ष मागे बसवण्याचा कर्नाटक सरकारचा नियम होता, तो मलाही लागू झाला. माझ्या शाळेचे नाव होते 'मराठी मुलांची शाळा शिरगुप्पी'. ही शाळा मारुतीच्या दोन मजली मंदिरात भरत होती. तळमजल्यावर मध्यभागी गाभाऱ्यात मारुती आणि भोवताली पहिली ते पाचवीचे वर्ग दाटीवाटीने भरायचे. वरच्या मजल्यावर दोन खोल्या. बाहेरच्या खोलीत सातवी आणि आतल्या खोलीत सहावीचा वर्ग. शाळेच्या पुढच्या बाजूलाही दोन खोल्यांत विद्यार्थी बसत, विद्यार्थ्यांना शाळा सुटल्यावर उपीट मिळायचे. कर्नाटकातल्या शाळेत मद्रासी विद्यार्थी भरपूर होते. जवळच जैन मंदिराला लागून उर्दू शाळाही होती. आमची शाळा पटसंख्या आणि गुणवत्तेसाठी जशी प्रसिद्ध होती, तशी ती मारक्या मास्तरांसाठीही प्रसिद्ध होती. एवढी मारहाण करणारे मास्तर म्हणजे त्यावेळचे मारके गुरुजी मी टाकळवाडीत आणि इतरत्रही कुठे बघितले नाहीत. या मारक्या गुरुजींमध्ये मुख्याध्यापक सगळ्यात आघाडीवर. शाळा सुरू झाली, की त्यांच्या हातातला लाकडी, काळा रूळ, दिवसभरात एकदा तरी विद्यार्थ्यांच्या अंगावर चालून फुटायचा. मग ते नवा रूळ घेऊन यायचे. तो शाळेतच मुख्याध्यापकांच्या कपाटात असायचा. 'सांगतो की नाही उत्तर... काल का गैरहजर राहिला होतास, अक्षर सुधारत का नाहीस' असे अनेक प्रश्न विचारत ते संबंधित विद्यार्थ्याकडे निघाले, की तो विद्यार्थी उभा राहायचा. मारायच्या अगोदरच जोरजोरात भोकाड पसरायचा, नाचायचा. आमची ही सगळी नाटकं गुरुजींना पाठ झाली होती. ते चिडायचे, दरडवायचे, शांत उभे राहायला सांगायचे आणि मग रूळ तुटेपर्यंत बडवायचे. मराठी शिकवणाऱ्या या गुरुजींचा मार खाल्ला, नाही असा एकही विद्यार्थी मला आठवत नाही.

मारके गुरुजी म्हणून मगदूम गुरुजींनी खूप लौकिक मिळवला होता. अनेक पालक आपल्या मुलाची प्रगती विचारायला शाळेत यायचे आणि ''गुरुजी याला मरेस्तोवर मारा; पण लय भारी शिकवा,'' अशी जणू काही विनंतीच करायचे आणि गुरुजी इमानेइतबारे त्याचे आज्ञापालन करायचे. अनेक विद्यार्थी मार खात खात घाबरून चड्डी

ओली करायचे. काही हातात दप्तर घेऊन घाबरून पळून जायचे. काही शाळेला दांडी मारायचे. मग दांडी मारणाऱ्या पोरांना हुडकून आणण्याची जबाबदारी आमच्यावर यायची. वडार समाजातील काही पोरं डुकरांसाठी असलेल्या घरात लपून बसायची. तेथून त्यांना उचलून गुरुजींसमोर उभे करायचे. शाळा चुकवतोस काय? असा प्रश्न विचारत बदडून काढायचे आणि बदडता बदडता एक वाक्य उच्चारायचे. 'अरे नालायकांनो, शाळा शिकल्याशिवाय शहाणे कसे होणार?' तुमचा विकास कसा होणार? गुरुजींची सुविचारांसारखी वाक्ये त्या वेळी कळायची नाहीत, पण आपल्या हिताचे काहीतरी बोलत असतील एवढा अंदाज यायचा.

गुरुजी गावात विठ्ठलाच्या देवळाजवळ राहायचे. बहुतेक विद्यार्थ्यांना गुरुजींच्या घरासमोरूनच शाळेला जावे लागत असे. गुरुजींची दहशत इतकी मोठी होती, की ते कोठेही दिसले तरी मारहाण करणार आणि कोठेही अभ्यासातील प्रश्न विचारणार हे ठरलेलेच. यावर विद्यार्थ्यांनी एक मार्ग काढला व गुरुजींच्या घरचा रस्ता चुकवून ते शाळेत येऊ लागले. कोणी बाजारपेठेतून, कोणी गावाबाहेरून, तर कोणी आणखी कोठून तरी शाळा गाठू लागले. शाळा असो वा नसो, गुरुजी कोठेही दिसले तरी हातपाय थरथर कापायचे. घरी कधी गुरुजींविषयी तक्रार केली, की माझी आईही गुरुजींच्या बाजूनेच उभी राहायची आणि म्हणायची, ''तुम्हांला चार फटके हाणल्याशिवाय अक्कल येणार नाही, गुरुजी बरोबरच करतात.''

गुरुजी जेवढे हुशार, तेवढेच आम्ही पोरंही हुशारच होतो. गुरुजी मारणारच याची खात्री अनेकदा आम्हांला घरातच व्हायची. गृहपाठ केलेला नसायचा, पाढे आणि कविताही पाठ झालेल्या नसायच्या. गुरुजी मारणार हे ठरलेलेच असायचे. यातून मार्ग काढण्यासाठी मग शाळेला दांडी मारायची. दांडी मारली, की दुसऱ्या दिवशी जास्त मार बसायचा. मग आणखी एक क्लृप्ती दोन-दोन चड्ड्या घालायच्या. शर्टच्या आत कापड, टॉवेल गुंडाळायचा. शर्टवर शर्ट घालायचा. मारू दे गुरुजींना. मार लागणारच नाही. गुरुजी आमच्यापेक्षा शहाणे. आमचे शरीर अचानक कसे फुगले हे त्यांच्या लक्षात यायचे. पाठीवर आणि पोटावर हात फिरवण्यासाठी ते जवळ यायचे. त्यांची खात्री पटायची, की मार चुकवण्यासाठी किंवा तो कमी बसावा यासाठी आम्ही एक सुरक्षा व्यवस्था तयार केली आहे. त्यांची खात्री पटली, की ते असे काही रूळ चालवायचे, की सुरक्षा व्यवस्था भेदून मार आत घुसायचा. रडणे, नाचणे, ओरडणे, गुरुजींच्या पाया पडणे आपोआपच सुरू व्हायचे. आमची याचना, प्रार्थना आणि कधी कधी घडणारे नाटक बघून गुरुजींना कधी आमच्याविषयी दया आली, कधी त्यांच्यामध्येच अपराधीपणाची भावना तयार झाली असे कधीच दिसले नाही आणि कळलेही नाही. एखाद्या कडक तपस्व्याप्रमाणे ते आम्हांला फोडत राहिले. हे कधी थांबणारच नव्हते याची खात्री झाल्यानंतर, मार खाण्याची सवय आधी लावून घेतली आणि गुरुजींनीही तेवढ्याच गांभीर्याने मारण्याची सवय कायम ठेवली, काहीही करून आपले सर्व विद्यार्थी शहाणे, ज्ञानी आणि हुशार झाले पाहिजेत अशी घोर भीष्मप्रतिज्ञा त्यांनी केलेली असावी असे त्यांच्या चेहऱ्यावरून वाटत होते. ते पुस्तकातले तर शिकवायचेच; पण पुस्तकाच्या बाहेरचेही जास्त शिकवायचे. तेव्हा आम्हांला उच्चारता न येणारा 'मार्क्स' हा शब्दही त्यांच्या ओठावर आला होता. राज्यघटना, धर्मनिरपेक्षता असेही शब्द आले होते. असे अवकाळी पावसाप्रमाणे आलेले शब्द उच्चारता यायचे नाहीत, म्हणूनही गुरुजींचा रूळ आमच्या अंगावर खेळायचा. पुढे पुढे रडू येणे आणि डोळ्यांतून पाणी येणेही बंद झाले. ओठांवर येणारे रडू आणि डोळ्यांतील नळाच्या पाण्याप्रमाणे गळणारे अश्रूही गुरुजींच्या रूळाने बंद करून टाकले होते. गुरुजींचा रूळ म्हणजे सर्कशीतल्या रिंगमास्तरच्या हातातील छडी किंवा जादूची छडी.

आमच्या गावात बाहत्तरचा दुष्काळ हातपाय पसरून दीर्घ मुक्कामासाठी आला आहे याची खात्री पटली. पाण्यासाठी लोक दाही दिशांना फिरू लागले. एका सायंकाळी मीही कोणाची तरी सायकल मागून घेतली. कॅरियरवर दोन आणि पुढे दोन घागरी लटकवून मी पाच-सहा किलोमीटरवरून पाणी आणत होतो. तेव्हाचे बालवय पाहता हे माझ्या शारीरिक क्षमतेच्या पलीकडचे होते; पण दुष्काळाने जणू काही माझी क्षमता वाढवली होती. दोन-तीन कोसांवरून पाण्याने भरलेल्या घागरी घेऊन मी

बसस्टँडपर्यंत पोहोचलो, सायकल चालवण्याचे बळ कमी कमी होत होते, आणि घर तर अजून एक किलोमीटरवर होते. हॅण्डल लटपटत होते. मांडीत गोळे येत होते. समोर बघायचो, खाली मान घालायचो. पायडल जोरात दाबायचो. सायकलवर चार भरलेल्या घागरी होत्या; पण सायकल चालवून घसा कोरडा पडला होता. पुन्हा एकदा पुढे नजर टाकली, तर मारके गुरुजी एका हॉटेलसमोरच्या मांडवाच्या लाकडी खांबाला पाठ टेकवून पेपर वाचताना दिसले. तशी त्यांच्याशी नजरानजरही झाली. पोटात गोळा आला. काहीतरी कारण काढून गुरुजी ठोकणार याची भीती वाटू लागली. पाय लटपटायला लागले. सायकलच्या पायडलवरचा दाब कमी होऊ लागला. तसे हात आणि हॅण्डलही लटपटू लागले. गुरुजी मारणार आणि मारलेच तर कमी मारावे असे मन म्हणत होते. या विवंचनेतच सायकल गुरुजींच्या पाठीवर आदळून, खाली पडली. मीही पडलो. आता गुरुजी उठतील आणि बडवायला लागतील असा विचार मनात आला. गुरुजी ताडकन उठले. सायकल उभी करायला, घागरी पुन्हा लटकवायला त्यांनी शांतपणे मदत केली. सायकल स्टँडवर उभी केली. सर्व काही ते गांभीर्याने करत होते. चेहऱ्यावर राग, त्रागा किंवा मला बडवण्याचे चिन्ह नव्हते. मला आश्चर्यच वाटले. गुरुजी वेडे झाले की काय? अजून त्यांनी मला मारले कसे नाही? अशी शंका मनात आली. भीती कायम होती. गुरुजींनी माझ्या खांद्यावर हात ठेवला. भीती वाढली; पण त्यांनी मारले नाही. शांतपणे ते म्हणाले, ''डचमळणाऱ्या घागरीप्रमाणे तुझे वय आहे. घागर डचमळली, की तोल जातो. जसा तुझा सायकलसह गेला. वयाचा, मनाचा तोल कधी जाऊ देऊ नकोस. तो गेला की माणूस खूप वाईटपणे पडतो. सांभाळ तोल आणि नीघ प्रवासाला.

सायकल चटकन स्टँडवरून ढकलली. अधिक वेगाने ती चालवत निघालो. गुरुजींनी मारले नाही याचा आनंद होता आणि ते असे वेगळे का वागले याविषयी खूप शंका होत्या. आयुष्यभर मी त्यांचे वाक्य लक्षात ठेवले. सर्वसामान्यांप्रमाणे माझाही तोल जाण्याचे क्षण माझ्या आयुष्यात आले होते, नाही असे नाही, पण वेगवेगळ्या प्रसंगी आणि कारणाने जेव्हा जेव्हा तोल जातो असे वाटले, तेव्हा तेव्हा मी गुरुजींचे हे वाक्य आठवत आलो. खरे तर ते कायमच माझ्या मनावर कोरले गेले होते. 'डचमळणाऱ्या घागरीप्रमाणे वयही तसे होते. अशा परिस्थितीत तोल सावरणे महत्त्वाचे असते, नाहीतर माणूस कोसळतो.'

◈◈◈

## प्रिय संपादक ....

मा संपादक महोदय.

आपल्या 'जीवन शिक्षण', जून २०२३ चे वाचन सिद्धी विशेषांक (भाग १) मध्ये माझा 'वाचन एक प्रेरणास्रोत' हा लेख आपण प्रसिद्ध केला त्याबद्दल आपले मा. संपादक/संचालक व प्रकाशन सल्लागार समिती सदस्य, सहायक सदस्य, अधिकारी, कर्मचारी यांचे मनःपूर्वक आभार.

वाचन सिद्धी विशेषांक (भाग १) चा अंक वाचनात आला. अंक दर्जेदार असून नावीन्यपूर्ण वैशिष्ट्यांनी परिपूर्ण आहे. अंकामधील सर्वच लेख मुख्याध्यापक व शिक्षकांसाठी प्रेरणादायी आहेत. विशेष म्हणजे अंकातील सर्वच लेख वाचन, वाचन संस्कृती, पुस्तक मैत्री, वाचन व्यक्तिमत्त्व व वाचनाचे महत्त्व सांगणारे आहेत. 'वाचनाचे जीवनातील महत्त्व', 'पुस्तके वाचूया जीवन घडवूया' 'पुस्तक मैत्री' हे लेख खूप वाचनीय व प्रेरणादायी आहेत. असे मार्गदर्शनपर लेख वाचायला मिळाले, याबद्दल संपादक मंडळाचे खूप खूप आभार!

**सौ. विद्या सा. दामोदरे**

जि. प. उच्च प्राथ. शाळा नायगाव, ता. अचलपूर, जि. अमरावती.

# इतिहासाच्या पानांवरून

श्रीकांत चौगुले
भ्रमणध्वनी : ७५०७७७९३९३

## शंभर वर्षांपूर्वी शिक्षकांचे पगार

सध्या शिक्षकांचे पगार चांगले आहेत. सातव्या वेतन आयोगामुळे तर बराच बदल झाला आहे. पूर्वी शिक्षकांचे पगार कमी असायचे. गरजाही मर्यादित होत्या. राहणीमानही साधे असायचे. साधारण शंभर वर्षांपूर्वीचा विचार करायचा झाला, तर शिक्षकांना त्यांच्या प्रशिक्षणानुसार पगार होता. प्राथमिक शिक्षकांचे तीन स्तर होते. एक वर्षाच्या ट्रेनिंगपासून तीन वर्षांच्या ट्रेनिंगपर्यंत ट्रेनिंगचे स्तर होते, त्याला ज्युनियर ट्रेंड, सीनियर ट्रेंड अशी नावे होती. १९१९ मध्ये शिक्षकांचे पगार अनुक्रमे पंधरा, वीस, पंचवीस रुपये असे होते. पहिल्या वर्षाचे प्रशिक्षण झालेल्या शिक्षकाला सुरुवातीला पंधरा रुपये पगार होता, तर दरवर्षी एक रुपया वेतनवाढ होती.

सुरुवातीच्या काळात पुणे आणि वर्धा या दोनच ठिकाणी ट्रेनिंग कॉलेजेस होती. पहिल्या वर्षाच्या ट्रेनिंगची परीक्षा चांगल्या श्रेणीत उत्तीर्ण होतील, त्यांचीच दुसऱ्या वर्षाच्या ट्रेनिंगसाठी निवड होत असे. विशेष म्हणजे या प्रशिक्षण काळातही साधारण पगाराएवढा स्टायपेंड (Stipend) मिळायचा.

तत्कालीन सरकारने एक हजार लोकसंख्येच्या गावात शाळा सुरू करण्याचे धोरण स्वीकारले, त्यानंतर शिक्षकांची संख्या वाढली. ट्रेनिंग कॉलेजेसही वाढली. शिक्षकांचा पगार आणि तत्कालीन सोन्याचा भाव यांचा विचार करता, १९२५ मध्ये सोन्याचा भाव अठरा रुपये तोळा इतका होता. यावरून असे लक्षात येते, की त्या काळातही शिक्षकांना खूप कमी पगार होता, असे म्हणता येणार नाही, पण तो आजच्या मानाने कमी होता हे मात्र नक्कीच.

त्या काळातील समाजव्यवस्था, एकत्र कुटुंबपद्धती, त्यागाची भावना, देशप्रेम, घरातील एखादीच व्यक्ती शिकलेली, नोकरी करणारी, त्यामुळे संपूर्ण कुटुंबाचा भार. अशा अनेक कारणांमुळे शिक्षकांचे राहणीमान साधे असायचे, असे वाटते.

सुरुवातीच्या काळात महिला शिक्षकांचे प्रमाण फार कमी होते. स्त्रिया शिकून स्वावलंबी व्हायला लागल्या, अशा काळात शिक्षिका होणे सोयीचे ठरले. पुढच्या काळात सर्वच क्षेत्रांत स्त्रियांनी भरारी मारली. समान काम असले, तरी महिलांना वेतन मात्र पुरुषांपेक्षा कमी मिळायचे, पण शिक्षिका झालेल्या स्त्रियांना पहिल्यांदा पुरुषांच्या बरोबरीने वेतन मिळू लागले ही बाबसुद्धा सामाजिकदृष्ट्या महत्त्वाची ठरते.



व्यवसाय मार्गदर्शन व मानसशास्त्रीय समुपदेशन विभागामार्फत पूर्व व्यावसायिक उपक्रमाकरिता क्षमता बांधणी 'दप्तराविना दहा दिवस शाळा' या राज्यस्तरीय कार्यशाळेत मार्गदर्शन करताना मा. संचालक व मा. सहसंचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.





इंग्रजी भाषा विभागाच्या वतीने इयत्ता पाचवी आणि आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी शालेय स्पर्धा परीक्षा संदर्भ पुस्तक निर्मितीसाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे येथे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यशाळेत परिषदेचे सहसंचालक, मा. रमाकांत काठमोरे यांनी संवाद साधून तज्ज्ञांची व परिषदेची मनोभूमिका समजावून दिली. याप्रसंगी राज्यभरातील इंग्रजी तज्ज्ञ उपस्थित होते.

उर्दू भाषा विभागामार्फत चार दिवसीय भाषिक कोडे व खेळ पुस्तिका (इयत्ता पहिली ते पाचवीसाठी) विकसन कार्यशाळा व संकलित चाचणी-१ प्रश्नपत्रिका विकसन कार्यशाळा संपन्न झाली. यावेळी परिषदेचे संचालक, मा. श्री. अमोल येडगे (भा.प्र.से.), सहसंचालक, मा. रमाकांत काठमोरे, मा. डॉ. कमलादेवी आवटे, उपसंचालक (भाषा विभाग), मा. श्री. अरुण सांगोलकर, विभाग प्रमुख (उर्दू भाषा), डॉ. बालमणी नंदाला, अधिव्याख्याता (उर्दू भाषा) उपस्थित होते.






Date of Publication : 1 September, 2023
Jeevan Shikshan Magazine is posted
on 3rd and 4th September, 2023
at GPO, PSO, Pune - 411 001.

**'Registered'**

RNI No. 14563/1957
Post Registration No.: PCW/063/2021-2023
Licensed to post without prepayment postage No.: **WPP - 28**




पत्रव्यवहाराचा पत्ता :
**संपादक, जीवन शिक्षण**
**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र**
७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०.
दूरध्वनी : ०२०–२४४८८३८२
फॅक्स नं.: ०२०–२४४७०९०.
**ई मेल :** jeevanshikshan@maa.ac.in

**प्रति** ____________________